रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ५० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



**HIRING ALERT**
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २६ जुलै २०२५

किंमत ४ ₹




## नैसर्गिक आपत्ती निधीतून सरकारी कार्यालयांची शो बाजी?

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात बदली झाल्यानंतर विशेषतः अलिबागसारख्या निसर्गरम्य ठिकाणी बदली झाल्यानंतर अ वर्गातील अधिकारी अलिशान कार्यालय बनविण्यासाठी धडपड करीत असल्याची कुजबूज अलीकडे सरकारी कार्यालयात ऐकायला मिळाली. सरकारी अधिकाऱ्यांचे अलिशान केबीन बनविण्यासाठी नियमबाह्यरितीने नैसर्गिक आपत्ती निधीचा वापर करण्यात आल्याचीही चर्चा सरकारी वर्तुळात सुरू आहे.

नैसर्गिक आपत्ती निधीचा उपयोग नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या लोकांच्या मदतीसाठी, पुनर्वसन आणि पुनर्रचनेसाठी तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी केला जातो. यामध्ये तात्काळ मदत, वैद्यकीय सुविधा, निवारा, अन्न, पिण्याचे पाणी तसेच आपत्तीनंतरच्या उपाययोजना जसे की रस्ते दुरुस्ती, घरे बांधणे आणि पुनर्वसन यांचा समावेश होतो. परंतु, या निधीचा वापर काही अधिकारी स्वतःच्या अलिशान दालनाच्या सजावटीसाठी करीत असतील, तर ती लाजिरवाणी बाब असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे. त्यामुळे शासनाने याबाबत जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांच्या दालनांवर कोणत्या निधीमधून खर्च करण्यात आला आहे, याची चौकशी करावी, अशी मागणीही सावंत यांनी केली आहे.

नैसर्गिक आपत्ती निधीचा वापर नियमांनुसारच करणे आवश्यक आहे. जर निधीचा वापर नियमांनुसार केला नाही, तर ते नियमबाह्य ठरते. यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे पालन करणे पान २ वर

### अधिकाऱ्यांवर होईल कारवाई?

**सरकारी निधीचा नियमबाह्य वापर केल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांवर कारवाई होऊ शकते. तसेच, निधीचा गैरवापर झाल्यास, बाधित लोकांना मदत मिळण्यास अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीमधील निधीचा वापर कार्यालयांच्या सुशोभिकरणासाठी वापरला असेल, त्यांच्यावर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**

## सरकारजमा झालेल्या कांदळवन राखीव जमिनीवर


# जेएसडब्ल्यूचे अतिक्रमण


- **सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांचा गौप्यस्फोट**
- **महसूल व वनविभाग पाडणार का अनधिकृत बांधकामे?**

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामधील मौजे जुई बापूजी येथील सर्वे नंबर ५०-ड मधील जेएसडब्ल्यू या नावे बेकायदेशीररित्या हस्तांतरित केलेली जमीन क्षेत्र १.८४ हे.आर. सरकारजमा झाले असले तरी या जमिनीवर जेएसडब्ल्यू कंपनीने आधीच अतिक्रमण केले असल्याचा गौप्यस्फोट सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे. याशिवाय महसूल व वन विभाग जेएसडब्ल्यू कंपनीने २००९ पासून कांदळवनांचे क्षेत्र नष्ट करून केलेला मातीचा भराव, संरक्षक भिंत, कनव्हेअर बेल्टसाठी सिमेंट कॉंक्रिटचे केलेले फाऊंडेशन अनधिकृत असून, ते बांधकाम पाडण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोपही सावंत यांनी केला आहे.

सावंत यांना माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, उपवनसंरक्षक अलिबाग यांच्या दि. १३ नोव्हेंबर २०१९ च्या जिल्हाधिकारी रायगड यांना सादर केलेल्या अहवालामध्ये जेएसडब्ल्यू स्टील कंपनीने अलिबाग तालुक्यातील शहाबाज ग्रामपंचायत अंतर्गत मौजे जुईबापूजी येथील सर्वे नंबर ५०-ड मधील १.८४ हे.आर. हे क्षेत्र राखीव वने म्हणून घोषित केले होते. या जमिनीमध्ये बेकायदेशीररित्या कब्जा करून संपूर्ण जमिनीमध्ये कंपनीने २००९ पासून कांदळवनांचे क्षेत्र नष्ट करण्याचा सपाटा लावाला. त्यानंतर प्रकल्पाच्या विस्ताराकरीता कंपनीने मातीचा भराव, संरक्षक भिंत, कनव्हेअर बेल्टसाठी सिमेंट कॉंक्रिटचे फाऊंडेशन अशी कामे विनापरवाना केली असल्याचेही उपवनसंरक्षकाने नमूद केले आहे. याबाबत सावंत यांनी सन २०२० मध्ये तत्कालीन वन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र, त्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. त्यानंतर राखीव वने म्हणून घोषित असलेली सरकारी जागा सीआरझेड १ व इकॉलॉजीकल सेन्सेटिव्ह क्षेत्रामध्ये येत असल्याचे सहाय्यक संचालक नगररचना अलिबाग यांनी दि. ७ सप्टेंबर २०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले. तसेच उपवनसंक्षक अलिबाग यांनी जिल्हाधिकारी रायगड, अपर प्रधान मुख्य संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे यांना सादर केलेल्या दि.१३ नोव्हेबर २०१९ रोजीच्या अहवालामध्ये या पान २ वर





### राखीव वनक्षेत्रात कंपनीकडून बांधकाम

**जेएसडब्ल्यू कंपनीने रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे या कांदळवनयुक्त जमिनीची मागणी ही ७ जुलै, २०११ रोजी केली असल्याचे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे दिसून येते. यातील गंभीर बाब म्हणजे, कंपनीने जमिनीची मागणी करण्याआधीपासूनच या कांदळवनांच्या राखीव वन क्षेत्रामध्ये वनेत्तर कामे केली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कांदळवन राखीव वन जमिनीवर कंपनीने मातीचा भराव २८ जानेवारी, २०१० पूर्वी केला आहे, तर संरक्षक भिंत ६ नोव्हेंबर २०११ रोजी बांधली आहे. तसेच कनव्हेअर बेल्टसाठी सिमेंट कॉंक्रिटचे फाऊंडेशनचे काम १ ऑक्टोबर २०१७ ते ४ एप्रिल २०१८ या कालावधीत पूर्ण केले आहे. कंपनीने अशी वनेत्तर कामे केली असल्याचा स्पष्ट अहवालच उपवनसंरक्षक विभागाने जिल्हाधिकारी यांना १५ सप्टेंबर, २०१८ आणि १३ नोव्हेंबर २०१९ रोजी दिला आहे. या अहवालामध्ये ही बेकायदा कांदळवन तोड जेएसडब्ल्यू कंपनीले केले असल्याचे अधोरेखित झाले आहे. आता ही जागा सरकारजमा झाल्यामुळे जिल्हाधिकारी व उपवनसरंक्षक यांनी तात्काळ कारवाई करून ही अनधिकृत बांधकामे पाडून टाकावीत, अशी मागणी सावंत यांनी केली आहे.**

## धोकवडेमध्ये पंत पाडवा साजरा

### शेकापचे नेते जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

| अलिबाग | प्रतिनिधी |

थोर संतश्रेष्ठ श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या जन्मदिनानिमित्त पंत पाडवा दिन धथोर संतश्रेष्ठ श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या जन्मदिनानिमित्त पंत पाडवा दिन धोकवडेमध्ये साजरा करण्यात आला. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यानिमित्त धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. तसेच सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा, शाळेतील विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमाच्या निमित्ताने पान २ वर



## प्रसन्न पुलेकरला २८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

| आगरदांडा | प्रतिनिधी |



मुरुड शहर व ग्रामीण भागातील जनतेस कमीत कमी एक लाख रुपये गुंतवल्यास प्रत्येक महिन्यास दहा हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणारा व तद्नंतर पैसे देण्यास नकार देणारा प्रसन्न पुलेकर यास मुरुड पोलिसांनी काही दिवसापूर्वी अटक केली होती.त्यास न्यायालयात सुरुवातीला हजर केले असता सर्वप्रथम पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्यानंतर त्यास पुन्हा न्यायालयात हजर केले असता २८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

मुख्य तक्रारदार महेश भगत यांनी व त्यांच्यासह १३६ जणांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवली होती. आतापर्यंत तक्रार दाखल झाल्यानंतर किमान आठ कोटी एक लाख २५ हजार रुपये फसवणूक झाल्याबाबत मुरुड पान २ वर

## महिलेवर जीवघेणा हल्ला

- **रेवदंडा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई**
- **स्थानिकांमध्ये संतापाची लाट**

| अलिबाग | प्रतिनिधी |

घरात घुसून एका विवाहित महिलेवर जीवघेणा हल्ला झाला. गेल कंपनीत कामाला असणाऱ्या परराज्यातील कामगाराने हा प्रकार केला आहे. तिचा गळा दाबण्यात आला होता. ही घटना गुरुवारी (दि.२४) दुपारी घडली. हल्लेखोराविरोधात रेवदंडा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई झाल्याने स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली. मात्र, पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या दणक्याने रेवदंडा पोलीस तातडीने कामाला लागले. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पारसकुमार असे या हल्लेखोराचे नाव आहे. हा मूळचा बिहार राज्यातील आहे. सध्या मूळ खानाव येथे भाड्याने राहात आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून तो गेल कंपनीत कामगार म्हणून काम करीत आहे. पीडित महिला गुरुवारी (दि.२४) दुपारी तिच्या घरात होती. या संधीचा फायदा घेत आरोपी पारसकुमार घरात घुसला. मागून तिचा गळा पान २ वर

## मंदार शिंगाडे यांना पितृशोक

| अलिबाग | प्रतिनिधी |



दादासाहेब गणपतराव शिंगाडे यांचे गुरुवारी (दि.२४) अल्पशा आजारामुळे निधन झाले. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे खासगी स्वीय सहाय्यक मंदार शिंगाडे यांचे ते वडील होत.

दादासाहेब शिंगाडे हे आदर्श शिक्षक होते. फुरसुंगी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गेल्या अनेक वर्षे सेवा केली होती. शैक्षणिक क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. गुरुवारी (दि.२४) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजारामुळे त्यांचे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कुटुंबियांचे सांत्वन केले. दादासाहेब शिंगाडे यांच्या निधनामुळे शिंगाडे कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

## रायगडला ऑरेंज अलर्ट

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला असून, अनेक भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. यामुळं नदी नाले दुथडी भरुन वाहात आहेत. तर अनेक ठिकाणी धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यासह मुंबई, ठाण्याला ऑरेंज अलर्ट, तर पालघर जिल्ह्याला रेड अलर्ट हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर पालघरमधील शाळा, कॉलेजला उद्या शनिवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

## ‘सरकारी शाळांचे ऑडिट करा’

| मुंबई | प्रतिनिधी |

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी गावातील सरकारी शाळेची इमारत कोसळून चार विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही भीषण दुर्घटना शुक्रवारी (दि.२५) सकाळी प्रार्थनेवेळी घडली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने पावले उचलत राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कंबर कसली आहे. राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी (दि.२५) एका उच्चस्तरीय बैठकीत राज्यातील सर्व सरकारी शाळांचे सुरक्षा ऑडिट करण्याचे पान २ वर

## पावणेचार कोटींचा गुटखा जप्त

- **चार आरोपींना ठोकल्या बेड्या**
- **नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई**

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने भिवंडी आणि मध्य प्रदेशातून आणलेला तब्बल ३ कोटी ७७ लाख २८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पाच कंटेनर आणि चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. हा गुटख्याचा साठा महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला गेल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. दरम्यान, आरोपींनी हा गुटख्याचा साठा कोठून आणला आणि कोठे विक्रीसाठी नेला जाणार होता? याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने मुंबई-पुणे महामार्गावर कामोठे येथे सापळा लावून भिवंडी येथून कामोठे येथे विक्रीसाठी आणण्यात आलेला टेम्पो पकडला होता. या कारवाईत पोलिसांनी फरहान माजिद शेख (२३) या तरुणाला अटक करुन टेम्पोसह तब्बल २२ लाख ४० हजार रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला होता. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने आरोपी फरहान याची अधिक चौकशी केली असता, त्याने सदर गुटख्याचा साठा भिवंडीतील येवई गावातून आणल्याची कबुली दिली. फरहान शेखकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पान २ वर

**केंद्राकडून निधी न आल्याचा फटका | एक कोटी रुपये शासनजमा**

# आंतरजातीय जोडपी अनुदानापासून वंचित

प्रमोद जाधव

| अलिबाग |

समाजातील दरी कमी करण्याबरोबरच जातीय सलोखा राखण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजना राबविली जाते. केंद्र व राज्य सरकारकडून प्रत्येकी ५० टक्के निधी दिला जातो. दोन्ही निधी आल्यावर लाभार्थ्यांना दिला जातो. परंतु, केंद्र सरकारडून निधी न आल्याने राज्य शासनाकडून आलेला एक कोटी १० लाख रुपयांचा निधी परत शासनजमा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आंतरजातीय विवाह योजनेतील लाभार्थी अनुदापासून वंचित आहेत. केंद्राकडून निधी न आल्याचा फटका लाभार्थ्यांना बसत आहे.





केंद्र व राज्य सरकारचा अनुक्रमे ५० टक्के हिस्सा आंतरजातीय विवाह प्रोत्साहेन अनुदान योजनेसाठी दिला जातो. जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जाते. योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या जोडप्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम थेट जमा केली जाते. राज्य व केंद्र सरकारचा एकत्र निधी आल्यावर अनुदान देण्याचे काम समाजकल्याण विभागाकडून केले जाते. अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, व भटक्या जमातींपैकी एक आणि दुसरी हिंदू, लिंगायत, जैन, शिख म्हणजे सवर्ण धर्मातील व्यक्ती असल्यास त्यांना आंतरजातीय विवाह योजनेचा लाभ दिला जातो. अस्पृश्यता निवारणाचा एक पान २ वर

### दीडशे जोडप्यांना अनुदानाची प्रतीक्षा

**रायगड जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला २०२४-२५ मध्ये २३० लाभार्थ्यांना आंतरजातीय विवाह योजनेचा लाभ मिळाला. ५० हजार रुपयांप्रमाणे एक कोटी १५ लाख रुपयांचे अनुदान त्यांना देण्यात आले. मात्र, १५० लाभार्थी अजूनही निधीअभावी अनुदानापासून वंचित आहेत. शासनाकडून ७५ लाख रुपयांचा निधी येणे बाकी आहे. लाभार्थी जोडप्यांना अनुदानाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.**

Shree Gopinath Mahadev Vedak Pratisthan's
G.M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA
APPROVED BY AICTE & DTE GOVT. OF MAHARASHTRA & AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI
CIVIL ENGINEERING
COMPUTER ENGINEERING
MECHANICAL ENGINEERING
ADMISSION OPEN
FIRST YEAR & DIRECT SECOND YEAR
Institute Code : 3447
www.gmvit.com
principal@gmvit.com
Dr. Dilip N. Jaiswal, Principal, 9022802204
Prof. S.N. Jadhav, Admission Incharge, 9022938458
Prof. K.P. Risbud, Asst. Admission Incharge, 8087898571
Prof. Jitesh Bhagat, Asst. Admission Incharge, 9021663422
At. Post & Taluka : Tala, Dist - Raigad, Maharashtra - 402111



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
२६ जुलै
१) श्री. बाळाराम वामन पाटील
मु.ढवर, अलिबाग, २६-७-१९४१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# थरकाप उडविणाऱ्या २५ अन् २६ जुलैच्या आठवणी
# दरडग्रस्तांच्या दुर्दैवाची कहाणी

**| शैलेश पालकर |**
**| पोलादपूर |**



२५ व २६ जुलै २००५ रोजी पोलादपूर तालुक्यामध्ये अतिवृष्टीने हाहाकार माजविला. काय झाले असेल? कानावर येणाऱ्या बातम्या अफवा तर नसतील ना? खरंच तसे घडलं असेल तर? प्रत्येकाच्या मनातील मानवतावादी विचार अंत:करण चर्रऽऽ करीत होता. तालुक्यातील उत्तरवाहिनी सावित्री, चोळई, कामथी, घोडवनी आणि ढवळी नद्यांची पात्र तुडूंब भरून वाहताना काठावरील शेतजमीन अन् भाताची रोपेही सोबत वाहून नेत होती. वीस वर्षांपूर्वीच्या २००५ च्या २५ अन् २६ जुलै या दोन दिवसांची आठवण ताजी होतेय. काय-काय घडले होते त्या दिवशी? महाड तालुक्यातील जुई, कोंडीवते, दासगांव, रोहन गावांत धरणीमातेच्या उदरात अनेक मानवी देह गाडले गेले, तोच प्रकार पोलादपूर तालुक्यातील कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक आणि लोहारे पवारवाडीमध्येही झाला. आपत्ती निवारणाच्या साधनांची कमतरता वाटेल इतपत महाडचा प्रसंग भीषण होता. त्यामुळेच पोलादपूर तालुक्यातील मनुष्यहानीच्या प्रसंगात गाडले गेलेले मृतदेह बाहेर काढण्यासाठी तसेच कशेडी घाटातील दरड हटविण्यासाठी कोणतीही तातडीची उपाययोजना होऊ न शकल्याने पोलादपूरचे जनजीवन तब्बल ११ दिवस ठप्प राहिले.

पोलादपूरचे वाचनालय इमारतीसह वाहून गेले. गंगामाता सभागृह वाहून गेले. सुंदरराव मोरे महाविद्यालय वाहून गेले. जुना महाबळेश्‍वर रस्ता खचला. सरकारी गोदामातील शेकडो टन धान्य भिजले. पोलादपूर शहरातील बाजारपेठेमध्ये पुराने छातीत धडधड वाढवली. गेल्या १०० वर्षांत असा पूर कधी कोणी पाहिला नव्हता.त्यावेळी ८२ वर्षांचे असलेले राम गुरूजी यांना घरातून बाहेर काढल्यानंतर त्यांनी सांगितले. वीजमंडळाच्या गोदामाची इमारत आणि शेजारची टपरीवजा हॉटेलची शेडही वाहून गेली. चित्रेंच्या घाटावरील तीन छोटी मंदिरेही फूटून वाहून गेली.

**भाग-१**

पोलादपूर तालुक्यात आजमितीस ४१ जेसीबी आहेत, पण त्याकाळी एक जेसीबी उपलब्ध न झाल्याने कोतवाल बुद्रुकमध्ये कृष्णा सकपाळ, गोपीबाई सकपाळ, काशीनाथ सकपाळ, कांता सकपाळ, राकेश सकपाळ, गीता सकपाळ आणि निखिल सकपाळ सारं कुटुंबच गाडलं गेलं आणि ते जेसीबीअभावी प्रेतं सडल्याने काढताही आली नव्हती. पैठणचा पूल वाहून गेला. कोतवाल खुर्दमध्येही तीनजण गाडली गेली. शेतजमिनी वाहून गेल्या. घरांना तडे गेले. दरडींनी घरं व्यापली. मोठमोठे दगड चेंडूसारखे टप्पे घेत काही घरांच्या कौलांतून पोटमाळ्यांवर येऊन थांबले. चरईच्या पुलाजवळ उत्तरवाहिनी सावित्रीचे पात्र दिशा बदलून परतले. बंडू चित्रेची चाळ वाहून गेली. बोरावळे येथे डोंगराला भेगा पडल्या. अनेक घरं दुभंगली. तुटवलीत डोंगर खचला अन् पुलही वाहून गेला. लोहारे पवारवाडीत जमीन दुभंगली अन् घर दुभंगून दोघे गाडले गेले. दोघे बचावले.

लेप्रसी हॉस्पिटलसमोरील ब्रिटिशकालीन पूलही दुभंगण्याचा धोका निर्माण झाला. अतिवृष्टी किती तब्बल १०० इंचांपेक्षा जास्त! भूस्खलन किती? महाड तालुक्यातील दासगांव, रोहन, जुई-कोंडीवते या गावांत मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली. पण, पोलादपूरंच स्वत:च्या दु:खामध्ये होतं. त्यामुळे कोण दुसऱ्याच्या दु:खावर कुंफ्कर घालणार? २५ आणि २६ जुलै २००५ न विसरता येणाऱ्या घटनाक्रमांचा काळ आणि केवळ काळच जो पोलादपूर तालुक्यात दोन दिवस ठाण मांडून तब्बल दहा जणांचे बळी घेणारा ठरला. अनेकांचे संसार उघड्यावर आणले. आता सर्व आठवणी मनात घर करून आहेत. पण, धास्ती कायमच आहे.

## किसन ढोकरे यांचे निधन

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील वरसगांव येथील रहिवासी हभप किसन कोंडू ढोकरे यांचे शुक्रवार, दि १८ जुलै रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. ते महावितरण कंपनीतून सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, वारकरी संप्रदयाचे नागरिक व समस्त वरसगाव ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, एक बहीण, दोन सुना, जावई, पुतणे, नातवंडे व मोठा ढोकरे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार, दि.२७ जुलै, तर उत्तरकार्य विधी बुधवार, दि. ३० जुलै रोजी त्यांच्या राहत्या निवासस्थानी होणार आहेत.



## मशीद, मदरसा ट्रस्टींना पोलिसांच्या सूचना

**पनवेल :** पनवेल तालुका पोलिसांनी हद्दीतील मशीद, मदरसा ट्रस्टी यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली. यावेळी पोनि कांबळे यांनी पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेशाचे अनुषंगाने ध्वनी प्रदूषणसंदर्भात योग्य ते मार्गदर्शन केले. या बैठकीस दहा पदाधिकारी उपस्थित होते. ही बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे विद्यमान मालक दया संजय पवार, रा.पवार चाळ, रुम नं.६९६. सुभाष वाडी, फडके रोड, हनुमान मंदिराजवळ, अंबरनाथ, नेतीवली बाजार, जि.ठाणे ४२१५०५ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे-डोणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८ | १ | ०-४७-०० | ६-३७ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२५

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे**
ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९९७५०९०३०४



### नगरपंचायत पोलादपूर

**मु.पो.ता.पोलादपूर, जि. रायगड दुरध्वनी क्रं.०२१९१ - २४०००१**
**ई मेल आयडी - poladpurnagarpanchayat@gmail.com**

जावक क्र.नपंपो/९२७ दिनांक २५/०७/२०२५

पोलादपूर नगरपंचायत पोलादपूर खाली नमुद केलेल्या कामासाठी योग्य त्या यंत्रणेकडे नोंदणीकृत असलेल्या अधिकृत मक्तेदार यांचेकडुन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्मची किंमत (रुपये) | बयाणा रक्कम (रुपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | पोलादपूर नगरपंचायत हद्दीत पावसाळी शेडचे साहित्य पुरवणे. | ५००/- | ५०००/- | १२० दिवस |
| २ | पोलादपूर नगर पंचायत हद्दीत विविध प्रभागात खडी, कपची व ग्रीट पुरवणे व पसरवणे | ५००/- | ५०००/- | ३६५ दिवस |
| ३ | पोलादपूर नगरपंचायत हद्दीत विविध कामासाठी जे.सी.बी. डंपर, पोकलन पुरवणे. | ५००/- | ५०००/- | ३६५ दिवस |
| ४ | पोलादपूर नगर पंचायत हद्दीतील विविध विकास कामांसाठी PMC(प्रकल्प सल्लागार) नेमणूक करणे | ५००/- | ५०००/- | ३६५ दिवस |
| ५ | पोलादपूर नगर पंचायत कर्मचाऱ्याना पावसाळी रेनकोट पुरवणे. | ५००/- | २०००/- | ३० दिवस |

**निविदा प्रसिद्धी तपशील**

| अ.क्र. | नगर परिषदेने करावयाची प्रक्रीया | दिनांकापासुन | दिनांकापर्यंत | लिफाफा |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | ११:०० वा पासून | | तांत्रिक व आर्थिक |
| २ | निविदा विक्री व सदर | ११:०० वा पासून | १८:०० वा पर्यंत | तांत्रिक व आर्थिक |
| ३ | अनामत रक्कम भरणा व निविदा प्रपत्र भरणा | ११:०० वा पासून | १८:०० वा पर्यंत | तांत्रिक व आर्थिक |
| ४ | निविदा उघडणे | | १३:०० वाजता (शक्य असल्यास) | तांत्रिक |

**अटी व शर्ती**
१. सर्व पात्र व इच्छुक मक्तेदारांनी ऑफलाईन पद्धतीने भरावयाची आहे.
२. जी.एस.टी.कर, मनुष्यबळ, दळणवळण, व इतर कर विचार करूनच दर सादर करावेत. सादर केलेल्या दरावर न.पा. कुठलाही जादाचा कर अदा करणार नाही.
३. कोऱ्या निविदेची रक्कम व बयाणा रक्कम ही फक्त ऑफलाईन पध्दतीनेच भरावी. दुसऱ्या कुठल्याही मार्गाने सदरची रक्कम स्विकारली जाणार नाही.
४. खालील नमुद केलेली सर्व कागदपत्र लिफाफा क्र १ तांत्रिक लिफाफा मध्ये सदर करावयाची आहेत. अन्यथा मक्तेदारास ई-निविदा प्रक्रियेतून बाद करणेत येईल.
A) ऑफलाईन भरलेल्या कोऱ्या निविदेची रकमेची प्रत व बयाणा रक्कमेची प्रत.
D) मागील ३ वर्षाचे C.A ने सर्टीफाईड केलेले Turnove प्रमाणपत्र.
E)अद्याप पर्यंत शासकीय कार्यालयाला मनुष्यबळ पुरवठा काम केल्याचे कार्यादेश व अनुभव प्रमाणपत्रे (Similar type of work)
F) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र व ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र.
५. तांत्रिक लिफाफ्यातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या मक्तेदारांचाच आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.
६. अटी व शर्तीची निविदा स्वीकारली जाणार नाही.
७. कोणतेही कारण न देता निविदा मंजुर वा नामंजुर किंवा रद्द करण्याचा अधिकार नगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

सही/-
**(विनय शिपाई)**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपूर**

**(प्रसाद इंगवले)**
**उपनगराध्यक्षा**
**पोलादपूर नगरपंचायत पोलादपूर**

सही/-
**(शिल्पा दरेकर )**
**नगराध्यक्षा**
**पोलादपूर नगरपंचायत पोलादपूर**


## बोध



संत एकनाथ महाराज एकनाथांच्या घरी सर्व प्रकारची सुबत्ता होती. त्यांना काय कमी होते म्हणून ते लहानपणीच सद्गुरु श्रीजनार्दन स्वामींकडे पळून गेले? सर्व सद्पुरुषांच्या चरित्रातून आपणास हेच दिसून येईल. परमेश्‍वराच्या भेटीसाठी तळमळणारे मन घेऊनच ते जन्माला आले. अशा तऱ्हेची प्रकृती, असा भाग्यवान जन्म मिळविण्यासाठी आपल्या गाठी अमाप पुण्याची जोड असावी लागते. हे एका जन्माचे काम नाही. उगीच खुळ्या कल्पनेच्या आहारी जाऊन काहीच मिळणार नाही. अनेक जन्मांची पुण्याई पाठीशी उभी हवी. देव मिळवायचा, आपलासा करायचा, ही काय साधी गोष्ट आहे? हे पुण्य फक्त नामस्मरणानेच जमा होईल.

**श्रीज्ञानेश्‍वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्यांना दणका

**सिडकोकडून चार डंपरचालकांविरोधात गुन्हा दाखल**

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीवर/भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकाकडून डेब्रिज टाकण्यात येत असून, ते मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. याविरोधात करण्यात आलेल्या कारवाईत चार डंपरचालकांविरोधात वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान, अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रीकी विभाग व पोलीस विभाग यांच्यासह दि. २२ जुलै रोजी सिडको कार्यक्षेत्रात मोहीम राबवत असताना संध्याकाळी चार वाजताच्या सुमारास डंपर क्रमांक एमएच ४३ सीई ३२५४ वरील चालक रमेश किसन पवार, ३७, रा. हनुमंत वाडी, ता. निलंगा, जि. लातूर, डंपर क्रमांक एमएच ०३ ईजी ९९१० वरील चालक साजीद अली साकीर अली, ३८, रा. व्हीलेज नेत्रीकला, उत्तरप्रदेश, डंपर क्र. एमएच ०४ एलवाय ७८७६ वरील चालक संजय चांदोबा कांबळे, ५०, रा. वाशी गाव, नवी मुंबई, डंपर क्र. एमएच ०३ ईएस ८६४७ या डंपरवरील चालकावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, उलवे जासई, परिसरात आरोग्यास हानिकारक डेब्रिज खाली करण्यासाठी जाण्याच्या प्रयत्नात असताना वाशी टोलनाका नवी मुंबई येथे मिळून आले.त्यांच्याविरुध्द वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### पनवेल महानगरपालिका
### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिके मार्फत विविध प्रकारचे कार्यक्रम अयोजन करण्या येत असतात या करिता पथनाटय सादर करणेकामी दर मागविण्यासाठी अंदाजपत्रक बनविण्याकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.
उपरोक्त कामाची सविस्तर माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/भांडार/५८७/२०२५
दिनांक :- २५/०७/२०२५

सही/-
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त (भांडार)**
**पनवेल महानगरपलिका**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ललीत गोंविद चौधरी, रा. अंबरनाथ ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.
मिळकतीचे वर्णन :- मौजे सापेले, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील बिनशेती मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| श्री उमेश गंगाराम कोकणे | ३२ | २ | १२.६०.०० | १२६ | ०० |
| | ३२ | ४अ | ३१.६०.०० | ३१६ | ०० |

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकती बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दि. २६/७/२०२५

**मनोज किसन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
मु. सम्राट नगर, पो. नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. पिन कोड ४१०१०१


पान १ वरून

## जेएसडब्ल्यूचे अतिक्रमण

राखीव वनांच्या जागेवर जेएसडब्ल्यू स्टील या कंपनीने २००९ पासून कांदळवनांचे क्षेत्र नष्ट करून विनापरवाना कामे केली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अतिक्रमण केल्याचे अहवालात स्पष्ट उपअधीक्षक भूमी अभिलेख, अलिबाग-रायगड यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना सादर केलेल्या दि. २३ जानेवारी २०२० च्या अहवालानुसार या जमिनीची संयुक्त मोजणी जेएसडल्यू कंपनीच्या प्रतिनीधींसह दि. १० जानेवारी ते १३ जानेवारीदरम्यान करण्यात आली. त्यावेळी या संपूर्ण १.८४ हे.आर. या राखीव वन जमिनीवर जेएसडब्ल्यू कंपनीतर्फे प्रकल्प विस्ताराचे काम दिसून आले असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. कंपनीने अतिक्रमण केल्याचेही या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन जेएसडब्ल्यू कंपनीने सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केले असल्याचे शासनाकडे प्राप्त अहवालांमधून स्वयंस्पष्ट होत आहे. त्यामुळे कंपनीविरोधात गुन्हे दाखल करण्याबाबत सावंत यांनी जिल्हाधिकारी रायगड व वन विभागासोबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला आहे. कंपनीने राखीव वन जमिनीमध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परंतु, बेकायदशीर बांधकामे निष्काषित करण्याबद्दल अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## सरकारी कार्यालयांची शो बाजी?

आवश्यक आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी सरकार किंवा इतर संस्था निधी देतात. या निधीचा वापर नियमांनुसार, म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत बाधित व्यक्तींना मदत करणे, पुनर्वसन करणे किंवा आवश्यक सुविधा पुरवणे यासाठीच करणे आवश्यक आहे. जर निधीचा वापर या नियमांनुसार न करता इतर कामांसाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी केला, तर तो नियमबाह्य ठरतो.

## महिलेवर जीवघेणा हल्ला

दाबून तिला ठार मारण्याचा प्रयत्न करीत असताना, तिने बचावासाठी आरडाओरड केली. ही बाब स्थानिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन त्या महिलेला सुखरूप सोडवले. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात पीडित महिला तक्रार दाखल करण्यास गेली. मात्र, तेथील पोलिसांनी तक्रार दाखल करण्यास दिरंगाई केली. पाच ते सहा तास होऊनदेखील आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल झाला नसल्याने स्थानिकांनी पोलिसांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली होती.

या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना मिळाली. त्यांनी रेवदंडा पोलिसांशी संपर्क साधून तात्काळ गुन्हा दाखल करण्याची सूचना केली. दलाल यांच्या दणक्याने रेवदंडा पोलिसांच्या कारवाईची हालचाल वेगात सुरू झाली. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे स्थानिकांनी सांगितले. दुखापत करण्याबरोबरच महिलेच्या अंगावरील दागिने चोरण्याच्या इराद्याने आरोपी घरात घुसून पाठीमागून महिलेची मान पकडल्याबाबत तक्रार नोंदविण्यात आली असून, आरोपी हा गेल कंपनीत गेल्या तीन महिन्यांपासून कामाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीराम पडवळ करीत आहेत.

## प्रसन्न पुलेकरला २८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

पोलीस ठाण्यात अनेकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तद्नंतर या फसवणूक रकमेतसुद्धा वाढ झाली असून, अनेक तक्रारदार आता सामोरे येत आहेत. मुरुड पोलीस या फसवणूक प्रकरणाची कसून चौकशी करीत आहेत. लोकांचे पैसे गोळा केल्यावर ते कोठे जमा करावयाचा, या प्रकरणात आणखीन कोणा-कोणाला त्याने पैसे दिले, पुलेकर याचे आणखीन कोण साथीदार आहेत.अशी विविध प्रकरणे शोधून काढण्यासाठी पोलीस तपास सुरू आहे. साथीदार यांना शोधून काढण्यासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याने याचा तपास जलद गतीने सुरू आहे.

मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास सुरू असून, प्रत्येक बाब तपासली जात आहे. कोणतीही बँक नसताना बँकेप्रमाणे आर्थिक व्यवहार करणे हा कायदेशीर गुन्हा असून, या कलमाचासुद्धा या केसमध्ये समायोजन करण्यात आले आहे. फसवणूक त्याचबरोबर अन्य कलमंसुद्धा त्यास लावण्यात आली आहेत. सध्या प्राप्त तक्रारीनुसार आठ कोटी रुपये फसवणूक रक्कम असली तरी सध्या अनेक तक्रारी प्राप्त होत झाल्याने हा आकडासुद्धा वाढत आहे. मुरुड पोलीस याबाबत अधिक तपास करीत असून, लवकरच याबाबतचे गूढ उकलले जाणार आहे.

## धोकवडेमध्ये पंत पाडवा साजरा

करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक नृपाल पाटील, शेकाप प्रवक्त्या तथा सोशल मीडिया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, सखाराम पवार, धोकवडेचे माजी सरपंच सचिन म्हात्रे, दत्ता झेमसे, सासवणेचे माजी सरपंच संतोष गावंड, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, मधुरा मुलुष्टे, अशोक म्हात्रे, शेकाप शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष अनिल गोमा पाटील, दिगंबर राणे, जगदीश म्हात्रे, ॲड. विजय पेढवी, सुशील पाटील आदी मान्यवरांसह श्रीपंत भक्त मंडळाचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

अर्वाचीन काळातील थोर संतश्रेष्ठ श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांचा जन्म श्रावण महिन्यात झाला. त्यामुळे श्रावण महिन्यातील पहिला दिवस श्रीपंत पाडवा म्हणून साजरा केला जातो. अलिबाग तालुक्यातील धोकवडे येथील श्रीपंत भक्त मंडळाच्या वतीने यावर्षी शुक्रवारी (दि.२५) पंत पाडव्याचे आयोजन करण्यात आले होते. शेकापचे नेते शंकरराव म्हात्रे यांच्या पुढाकाराने ग्रामस्थांनी गेल्या ४३ वर्षांची परंपरा आजही जपली आहे. पंत पाडव्याचे औचित्य साधत विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

अभिजीतपंत बाळेकुंद्री यांच्या हस्ते श्रीपंत यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी शेकापच्या नेत्या माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे पुण्यस्मरण करण्यात आले. तसेच उद्योजक निशिकांत लाड व सामाजिक कार्यकर्ते कमळाकर राणे यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. दहावी, बारावीच्या परीक्षेत एक ते तीन क्रमांक आणि ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या पंचक्रोशीतल १२ शाळांमधील विद्यार्थ्यांचा तसेच वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. श्रीपंत पाडव्याच्या निमित्ताने आठ दिवसांपूर्वी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत एक ते तीन क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचादेखील बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

## पावणेचार कोटींचा गुटखा जप्त

पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, सूरज गोरे यांनी तीन पोलीस अधिकारी आणि २० पोलीस अंमलदार यांच्या मदतीने नाशिक-ठाणे महामार्गावरील येवई गावात छापा टाकला. यावेळी याठिकाणी प्रतिबंधित गुटख्याने भरलेले चार कंटेनर आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी तीन चालकांसह गुटख्याने भरलेले चारही कंटेनर बेलापूर येथील अंमली पदार्थ विरोधी कक्षात आणले. त्यानंतर अन्न-औषध प्रशासनाच्या अधिकऱ्यांच्या मदतीने त्याची तपासणी केली असता चारही कंटेनरमध्ये तब्बल ३ कोटी ५४ लाख ८८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा असल्याचे आढळून आले. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने जितेंद्र मांगीलाल वसुनिया, भूपेंद्र राजेंद्र सिंग आणि भंवर खेमराज सिंग या तीन चालकांना अटक केली. या संपूर्ण कारवाईत पाच कंटेनरसह तब्बल ३ कोटी ७७ लाख रुपयांचा गुटख्याचा साठा जप्त करुन एकूण चार आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी दिली. कामोठे येथील कारवाईत पकडण्यात आलेला आरोपी फरहान शेख याला न्यायालयाने पोलीस कोठडी ठोठावली असल्याचे राजपूत यांनी सांगितले.

## सरकारी शाळांचे ऑडिट करा

आणि धोकादायक इमारतींना तातडीने निधी देण्याचे निर्देश दिले आहेत.

राजस्थानमधील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेतली. राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्‍वभूमीवर शाळांच्या इमारतींच्या सद्य:स्थितीचा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. राजस्थानसारखी दुर्दैवी घटना महाराष्ट्रात घडू नये, यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी अधिकाऱ्यांना केले. पत्रकार परिषदेत बोलताना मंत्री भोयर म्हणाले, ‘‘विद्यार्थ्यांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. राजस्थानची घटना अत्यंत वेदनादायी असून, त्यातून धडा घेत आम्ही प्रतिबंधात्मक उपाययोजना करत आहोत.’’ बैठकीत राज्यातील शाळांच्या सुरक्षेबाबत मंत्री पंकज भोयर यांनी काही महत्त्वाचे आणि तातडीचे निर्देश दिले आहेत. यामध्ये त्यांनी राज्यातील सर्व सरकारी शाळांच्या इमारतींचे तातडीने सुरक्षा ऑडिट करून त्याचा अहवाल सादर करावा, ऑडिटमध्ये धोकादायक आढळलेल्या शाळांच्या इमारतींच्या दुरुस्ती आणि डागडुजीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, या दुरुस्तीच्या कामासाठी जिल्हा नियोजन निधीमधून आवश्यक निधी तातडीने वर्ग करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येणार नाही, याची संपूर्ण खबरदारी शिक्षण विभागाने घ्यावी, असेही त्यांनी बजावले. या निर्णयामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, पावसाळ्यात शाळांच्या धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## आंतरजातीय जोडपी अनुदानापासून वंचित

भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली.

या योजनेला रायगड जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. शेकडो जोडप्यांकडून अर्ज केले जात आहे. त्याची पडताळणी, तपासणी केल्यावर लाभार्थी पात्र ठरविले जातात. शासनाकडून येणाऱ्या निधीद्वारे अनुदान दिले जाते. परंतु, गेल्या अनेक वर्षांपासून शासनाकडून निधी येण्यामध्ये सावळा गोंधळ निर्माण झाला आहे. राज्याचा निधी येतो, तर केंद्राचा नाही. केंद्राचा निधी आला, तर राज्याचा नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे निधी अनुदानाच्या स्वरुपात वितरीत करताना अडचणी निर्माण होत आहे. २०१८-१९ मध्ये राज्य सरकारकडून एक कोटी दहा लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला वर्ग केला होता. परंतु, त्यातील ५० टक्के हिस्सा, केंद्र सरकारकडून निधीच्या स्वरूपात आला नाही. त्याचा परिणाम राज्य सरकारकडून आलेला निधी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला शासनाकडे परत जमा करावा लागला. योजना राबवित असताना निधी वेळेवर मिळत नसल्याच्या या प्रकारामुळे आंतरजातीय विवाह योजनेतील जोडप्यांना अनुदानाची प्रतीक्षा करावी लागत आहे. हा प्रश्न कधी सुटणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**समाजकल्याण विभाग अधिकाऱ्याविना**

रायगड जिल्हा परिषद समाजकल्याण विभागात २०१४ पासून पूर्णवेळ समाजकल्याण अधिकारी नसल्याचा प्रकार समोर आला आहे. महिला व बालकल्याण विभागाचे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, त्यानंतर पशुसंवर्धन विभागाचे तत्कालीन पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्याम कदम, त्यानंतर गजानन लेंडी, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांच्याकडे आतापर्यंत समाजकल्याण विभागाचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला आहे. श्याम कदम यांची बदली झाल्यानंतर या विभागाला कोणीही वाली नसल्याने सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जलिंदर पाठारे, कृषी विभागाचे कृषी विकास अधिकारी निजन यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. परंतु, यातील कोणीही अतिरिक्त पदभार घेण्यास तयार नाही. त्यामुळे हा विभाग अधिकाऱ्याविना, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे वंचित घटकापर्यंत योजना पोहोचण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

## निवडक



### तिकीट तपासनीसचा प्रामाणिकपणा

**कर्जत :** माथेरान शटल सेवेचे तिकीट तपासनीस विजय लांडगे यांनी माथेरान शटल सेवेत सेवा बजावत असताना मिळालेले बॅग प्रवाशाला परत करून माणुसकीच दर्शन घडवले आहे. विजय लांडगे तारीख १३ जुलै रोजी तिकीट तपासनीस म्हणून माथेरान ते अमनलॉज दरम्यान शटल वर आपले कर्तव्य बजावत असतांना मिनीट्रेन अमनलॉजहुन माथेरान स्टेशनवर पोहचली, तिकीट तपासनीस विजय लांडगे यांना संपूर्ण गाडी रिकामी झाली असता एक बॅग कोणाची तरी राहिल्याचे लक्षात आले त्यांनी ती बॅग माथेरान स्टेशनमास्तरकडे सुपूर्द केली. स्टेशनमास्तरने ज्या प्रवाशाची बॅग विसरली होती त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याला स्टेशनमास्तर कार्यालयात बोलावून घेतले सांगितले व ओळख पटवून प्रवाशी उदयन पालवे यांना बॅग परत केली. बॅग मध्ये एटीएम कार्ड तसेच इतर महत्वाची कागदपत्र पत्र व रोख रक्कम ४५०० हजार होते प्रवाशाला बॅग परत मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करत तिकीट तपासनीस विजय लांडगे यांच्यासह उपस्थित रेल्वे कर्मचारी वर्गाचे आभार मानले. विजय लांडगे हे एक प्रामाणिक अधिकारी असून त्यांनी अगोदरदेखील दिव्यांग प्रवाशांना मदत करणे तर लोकल ट्रेनमधून पडतांना एक प्रवाशाचा नेरळ स्टेशनवर जीवदेखील वाचवला आहे. त्यांच्या ह्या कार्याची रेल्वे प्रशासनाकडून दखल घेत त्यांचा गौरव करून त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले होते.

### केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात!



**माणगाव :** माणगाव पंचायत समिती अंतर्गत उतेखोल केंद्रांची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अभ्यासपूर्ण वातावरणात संपन्न झाली. विकास कॉलनी शाळेच्या शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे यांनी इयत्ता पहिलीचा बदललेला अभ्यासक्रम आणि नावीन्यपूर्ण उपक्रम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.शिक्षिका वैशाली पवार यांनी गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा संदर्भात प्रत्यक्ष माहिती पुस्तिकेसह सविस्तर देऊन मार्गदर्शन केले. शिक्षिका स्नेहल उतेकर यांनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती, मंथन, आरटीएस स्पर्धा परीक्षा या विषयावर सविस्तर उदाहरण दाखल्यासह सविस्तर अभ्यासपूर्ण माहिती दिली आणि मार्गदर्शन केले. शंकर शिंदे यांनी नवभारत साक्षरता, शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा, पायाभूत परीक्षा,विद्यार्थी सुरक्षा, निपुण भारत अभियान, विद्यार्थी अध्ययन स्तर निश्चिती, आपत्कालीन परिस्थितीत व्यवस्थापन, स्कॉप संदर्भात माहिती, घरघर संविधान, शालेय भौतिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तक, विद्यार्थी प्रमोशन, आदिवासी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आदी प्रशासकीय विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप.

**उरण :** श्री.रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था आवरे, एएससी कॉलेज बीएससी बॅच १९९२ च्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शाळा आवरे, गोवठणे, पाले, पाणदिवे, सारडे वशेणी, पुनाडे, पुनाडे वाडी, कडापे या दहा गाव परिसरातल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वह्या वाटप करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी संस्थेचे पदाधिकारी नितीन गावंड, पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन अध्यक्ष, अ‍ॅड. राजेश ठाकूर, रामलाल ठाकूर, संजय म्हात्रे, सदाशिव पाटील, हसुराम म्हात्रे या सहकाऱ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षक वर्गांनी सहकार्य केले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप गावंड, साईनाथ गावंड, सदाशिव पाटील, राजेश कोंडिलकर, गणेश गावंड, अनिल गावंड आदींनी विशेष मेहनत घेतली. यावेळी शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.




# रायगड जिल्ह्यातील धरणे तुडूंब

## नदी, नाले ओसंडून वाहू लागले;२३ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा

| प्रमोद जाधव |
| अलिबाग

**जिल्ह्यामध्ये पावसाची संततधार सतत सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील धरणे, नदी, पाण्याने भरली आहे. जिल्ह्यातील कोलाड येथील लघू पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणारी धरणे फुल्ल झाली आहेत. रोहा, म्हसळा, महाड, सुधागड, खालापूर, तळा, मूरूड, पेण, कर्जत, पनवेल, श्रीवर्धन, या तालुक्यांतील २३ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा झाला आहे. धरणांच्या पातळीत कमालीची वाढ झाली आहे.**



गेली कित्येक दिवस पावसाने काही प्रमाणात विश्रांती घेतली होती. परंतू गेल्या चार दिवसांपासून पावसाने पुन्हा जोरदार सुरूवात केली आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे सखल भागात पाणी साचले असून नदी, तलाव, विहिरीदेखील पाण्याने भरल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिकांसह कारखान्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये जलसाठा वाढू लागला आहे. लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत.या धरणांद्वारे ग्रामीण व शहरी भागात पाणीपुरवठा केला जातो. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात धरणांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. धरणांतील पाण्याची पातळी वाढल्याने पाण्याचा पुरवठा ही मुबलक प्रमाणात होऊ लागला आहे. रोहा, म्हसळा, महाड, सुधागड, खालापूर, तळा, मूरूड, पेण, कर्जत, पनवेल, श्रीवर्धन या तालुक्यातील सुतारवाडी, पाभरे, संदेरी, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, वरंध, कोंडगांव, उन्हेरे, कवेळे, भिलवले, वावा, फणसाड, घोटवडे, कलोते-मोकाशी, डोणवत, आंबेघर, उसरण, मोरबे, अवसरे बामणोली, ढोकशेत, कुडकी या २३ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा आहे. कर्जत तालुक्यातील साळोख, श्रीवर्धनमधील कार्ले या दोन धरणांमध्ये ९९ टक्के, उरणमधील पुनाडे आणि अलिबागमधील श्रीगाव धरणामध्ये ७५ टक्के तसेच श्रीवर्धनमधील रानीवली धरणामध्ये ५० टक्के जलसाठा असल्याची माहिती लघु पाटबंधारे विभागाने दिली.

### कुंडलिकेने ओलांडली इशारा पातळी

**जिल्ह्यातील महाड येथील सावित्री, रोहा येथील अंबा, कुंडलिका, कर्जतमधील उल्हास आणि पनवेलमधील गाढी या प्रमुख नद्या आहेत.या नद्यांमध्ये सध्या ३.६४ मी.पासून २३.१५ मी. जलसाठा आहे. कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. धोका पातळीच्या वाटेवर पाण्याची पातळी असल्याचे चित्र आहे. तर उर्वरित पाच नद्यांमध्ये इशारा पातळीपेक्षा कमी जलसाठा असल्याची माहिती रायगड पाटबंधारे विभाग पुरनियंत्रण कक्ष अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.**

## सामूहिक लग्न सोहळ्याच्या आयोजकांवर गुन्हा दाखल

### जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपका; पोलिसांकडून कारवाई

| भाकरवड | वार्ताहर |

अलिबाग तालुक्यातील पोयनाड हद्दीतील हॉटेल पाटील ब्रदर्स पांडवादेवी येथे १००० जोडप्यांचा सामूहिक पद्धतीने लग्न सोहळा आयोजित केला होता. आयोजकांनी जिल्हाधिकारी रायगड यांचे जमावबंदीचे आदेश असताना देखील कोणतीही परवानगी न घेता सोहळ्याचे आयोजन केल्याचा ठपका आयोजकांवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोहळ्याठिकाणी भांडण झाल्याप्रकरणी सहा जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

पोयनाड येथे आयोजित केलेल्या सामूहिक लग्नसोहळ्याला रायगड जिल्ह्यातून जवळपास तीन ते चार हजार लोक उपस्थित होते मात्र तेथे आलेल्या सर्व वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था अपुरी असल्यामुळे सर्व गाड्या रोडवर लागून वाहतूक कोंडी झाली होती. पेण,अलिबाग हा महामार्ग अरुंद असल्यामुळे येणारे पर्यटक व कार्यक्रमासाठी उपस्थित महिलावर्ग, पुरुषवर्ग, त्यातच रविवार असल्याने मुरुड जंजिरा, अलिबागकडे येणाऱ्या व जाणाऱ्या पर्यटकांना या ट्राफिकमुळे आपला अमूल्य वेळ खर्च करावा लागला.

पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश सांगडे यांना ही माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ घटनास्थळी प्रत्यक्षरीत्या पाहणी करून ट्राफिक ए.एस.आय. पवार, ए.एस.आय.भगत, पोलीस हवालदार सतीश पाटील यांची नियुक्ती करून ट्रॅफिक नियंत्रणात आणण्यात आली. ज्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केलं होतं त्याना भेटून त्यांच्याकडून संपूर्ण माहिती घेतली मात्र आयोजकांकडून कोणत्याही प्रकारची परवानगी नसल्याने आयोजकांवर पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपका आयोजकांवर ठेवण्यात आला आहे. तसेच विवाह सोहळ्यामध्ये भांडण झाल्याप्रकरणी सहा जणांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश सांगडे, पोलीस उपनिरीक्षक अशोक कोल्हे यांनी दिली.

## ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रमांतर्गत श्रीक्षेत्र कनकेश्वर येथे वृक्षारोपण




| अलिबाग | प्रतिनिधी |

‘एक पेड माँ के नाम’ या संकल्पनेअंतर्गत श्रीक्षेत्र कनकेश्वर येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग आणि स्वयंसिद्धा संचलित स्पर्धा विश्व अकॅडमी, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने व युवा अधिकारी अमित पुंडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या उपक्रमाचे नेतृत्व प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त भारत सरकार तपस्वी गोंधळी यांनी केले.

## तिसरी झोनल वैद्यकीय परिषद संपन्न

| कर्जत | वार्ताहर |

रायगड मेडिकल असोसिएशनची तिसरी झोनल वैद्यकीय परिषद पनवेल येथे पार पडली, रायगड व नजीकच्या परिसरातील अनेक मान्यवर डॉक्टरांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला.



पनवेल खांदा येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाची सुरुवात रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. त्यांनी संघटनेच्या उपक्रमांविषयी आणि आगामी शैक्षणिक योजनांविषयी उपस्थितांना माहिती दिली.

त्यानंतर जिल्हा सचिव डॉ. प्रशांत गांगल यांनी उपस्थित सर्व मान्यवर डॉक्टरांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या हेतूची रूपरेषा मांडली. या झोनल मध्ये खास निमंत्रित वक्ते म्हणून खालील कर्करोग तज्ज्ञ डॉ. देवेंद्र पाल, डॉ. रजिउद्दीन ख्वाजा, डॉ. कस्तुरी बरुआ यांनी विविध कर्करोगांच्या निदान, उपचार व नवे संशोधन या विषयांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमात माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद गांधी, डॉ. रमेश पटेल, डॉ. अरुण भगत, तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. मिलिंद घरत, डॉ. अनिल पराडकर, डॉ. सतीश भोईर , डॉ. विशाल वाणी, डॉ सचिन आगलावे, खारघर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अनिल भाळे, अध्यक्ष डॉ. शिरीष जोशी, डॉ. सौरभ फडके, डॉ. विनय शेलार, डॉ. निखिल भारंबे, डॉ. देवेंद्र पाल आदी प्रमुख तज्ज्ञ डॉक्टर्स उपस्थित होते.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; जुगार चालकांवर गुन्हा दाखल

| पनवेल | वार्ताहर |

नवीन पनवेल येथील बालभारतीजवळील जुगार अड्ड्यावर खांदेश्वर पोलिसांनी धाड टाकली. चार मोटारगाड्या, दोन दुचाकी आणि रोकड पोलिसांनी हस्तगत केली.

बालभारतीजवळील जुगार अड्डात्याभागात अतिशयकुविख्यात आहे. अनेकदा पोलिसांनी छापे मारुनही पुन्हा पुन्हा अड्डा वारंवार सुरू होत असल्याने याची नेमकी गोम काय? असा प्रश्न स्थानिक विचारत आहेत. वैभव मढवी, जितेंद्र गायकर, सागर प्रकाश जाधव, राकेश प्रजापती, रूपेश म्हात्रे, गोविंद काटे आदीविरुद्ध खांदेश्वर पोलिसांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी छापा टाकला. तेव्हा तिथे अंदर बाहर पैसे लावून जुगार खेळला जात असल्याचे निदर्शनास आले, पोलिसांची चाहुल लागताच काही जण तिकडून पळून गेले, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, सपोनि पंडित पवार, पोलीस उपनिरीक्षक माधव इंगळे आदींनी कारवाईत भाग घेतला होता.

## वृद्ध इसमाची केली फसवणूक

**पनवेल :** दोन अनोळखी इसमानी पोलीस असल्याची बतावणी करून एका वृद्ध इसमाची केली फसवणूक केल्याची घटना तक्का कॉलनी येथे घडली आहे .

राधाकृष्ण मेनन (७२) हे तक्का येथे असताना दोन अनोळखी इसमानी पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्याकडील एक लाख वीस हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या चैनी त्यांची फसवणूक करून काढून घेऊन ते दोघे पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विशेष रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादी हजारापार

| रायगड | प्रतिनिधी |

कोकणातील नियमित रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादी हजारापार होण्याचे प्रकार याआधी झाले आहेत. तर, आता गणेशोत्सवासाठी विशेष रेल्वेगाड्या चालवण्याची घोषणा करण्यात आली असून या रेल्वेगाड्यांचे आरक्षण सुरू झाल्यानंतर, एका मिनिटांत प्रतीक्षा यादी सुरू होते. त्यामुळे बहुसंख्य कोकणवासियांना आरक्षित तिकीट मिळू शकले नाही. तर, काही रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादी हजारापार गेल्याने तिकीट मिळणे कठीण झाले आहे.

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. परंतु, रेल्वेचे आरक्षित तिकीट मिळत नसल्याने कोकणवासियांना एसटी किंवा खासगी बसचे तिकीट काढून प्रवास करावा लागणार आहे. त्यामुळे जादा पैसे आणि प्रवासासाठी अधिक वेळ यात वाया जाणार आहे. गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्यांना रेल्वेचे आरक्षित तिकीट मिळावे यासाठी रेल्वे प्रशासनाने २५० विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे. मात्र, या विशेष रेल्वेगाडीचे विशेष शुल्क देऊनही आरक्षित तिकीट मिळत नसल्याने प्रवासी गोंधळात पडले आहेत.



यावर्षी २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सव असून, २५ आणि २६ ऑगस्ट रोजीचे तिकीट काढणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे या दिवशी सुटणाऱ्या रेल्वेगाड्यांची तिकिटे मिळणे कठीण झाले आहे. २४ जुलै रोजी आरक्षित तिकीट मिळण्यासाठी, प्रवासी सकाळी ७.३० वाजेपासून तयारीत होते. सकाळी ८ वाजता तिकीट काढण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर एका मिनिटांत प्रतीक्षा यादीची क्षमता पूर्ण झाल्याने रिग्रेट असा संदेश आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर येऊ लागला.तर, गाडी क्रमांक ०११६७ एलटीटी सावंतवाडी विशेष रेल्वेगाडीची प्रतीक्षा यादी हजारापार गेली.

## मोबाईल चोरट्यांना केले गजाआड

**पनवेल :** उसर्ली गावामधील मोबाईल शॉपचे शटर उचकटवून चोरट्यांनी शॉपमधील ३० मोबाईल चोरी करून नेले होते. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सवाईसिंग भाटी यांच्या मोबाईल दुकानात चोरी होताच याबाबतची तक्रार पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितिन ठाकरे यांनी तात्काळ दाखल गुन्ह्याची नोंद घेत पोलीस तपास पथक स्थापन करून पथकातील सपोनि फडतरे, पोहवा बोरसे, म्हात्रे, शेवाळे, पाटील, पोना भोसले, पोशि कराड, पोशि दुधे यांनी अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन आरोपी रोहन आर्या व त्याचा सहकारी विनायक रंगप्पा याना अटक करून त्यांच्याडून सुमारे ७ लाख रुपये किमतीचे मोबाईल व रोख रक्कम हस्तगत करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.




### भांडी घडविण्याचा व्यवसाय पूर्णतः डबघाईस | रेवदंड्यातील त्वष्टा कासार समाज अस्तित्व टिकवून

## स्टिलच्या जमान्यात तांबापितळेची भांडी हद्दपार

| रेवदंडा | प्रतिनिधी |

चौलच्या ऐतिहासिक चंपावतीनगरीचा वारसा सांगणारे त्वष्टा कासार समाजाचा तांबा व पितळेची भांडी घडविण्याचा व्यवसाय आधुनिक स्टिलच्या जमान्यात पूर्णतः डबघाईस आला असून नाममात्र अस्तित्व टिकवून आहे.

रेवदंडा व चौलच्या ऐतिहासिक चंपावतीनगरीत अंदाजे तीनशे वर्षापासून तांबा पितळेची भांडी बनविण्याचे मोठे कारखाने अस्तित्वात होते. या समाजाचे दैवत महाकाली मातेचे प्राचीत मंदिर चौल बेलाई येथे आहे. तांबापितळेची भांडी बनविण्याच्या व्यवसायासह बांगड्यांचा पारंपरिक व्यवसाय सुध्दा हा त्वष्टा कासार समाजाचा आहे. आजही त्वष्टा कासार समाज बांधव रेवदंडा व चौलमध्ये असून तांबापितळेच्या भांडी बनविण्याचा व्यवसाय अद्यापी सुरू आहे. मात्र हा तांबापितळेची भांडी घडविणे व बनविण्याचा व्यवसाय पूर्णतः डबघाईस असून या समाजाने इतर व्यवसायात प्रवेश घेतल्याचे दिसते.



रेवदंडा व चौलमध्ये तीनशे वर्षापूर्वीपासून सन १९७५ पर्यंत तांबापितळेची भांडी बनविणे, विक्री करणे, तसेच तांबा पितळेच्या भांड्यांना कल्हई लावणे आदी त्वष्टा कासार समाजाचा व्यवसाय जोमाने सुरू होता. प्रामुख्याने वडके, दांडेकर, आदी त्वष्टा कासार समाज बांधवाचे तांबा पितळेची भांडी बनविण्याचे कारखाने येथे होते.

सन १९७५-७६ पर्यंत हे रेवदंडा व चौल मध्ये तांबा पितळेची भांडी बनविण्याचे कारखाने सुरू होते, मात्र स्टिलची भांडी स्वस्त दरात उपलब्ध होवू लागल्याने तसेच प्रवासात प्लास्टीक बाटल्या व इतर धातूची भांडी उत्पादने स्वस्त दरात मिळू लागल्याने तांबा पितळेच्या भांड्यांची मागणी आपोआप कमी झाली. त्यामुळे रेवदंडा व चौलमधील त्वष्टा कासार समाजाचे तांबा व पितळेची भांडी बनविण्याचे कारखाने बंद पडले. येथील त्वष्टा कासार समाजाचा तांबापितळेची भांडी बनविणे, कल्हई लावणे आदी व्यवसाय हळूहळू डबघाईस आले. येथील त्वष्टा कासार समाजाने इतर व्यवसायात प्रवेश करून उपजीविकेचे साधन बनविले आहे. रेवदंडा येथे त्वष्टा कासार समाजाचे वडके, दांडेकर हे समाज बांधवानी इतर व्यवसायात प्रवेश केला आहे, मात्र इतर व्यवसायाशी संलग्न राहून तांबा, पितळेची भांडी मागणीनुसार नव्याने बनवून देत आहेत.

केसरीनाथ वडके यांनी सुध्दा इतर व्यवसाय करत असून जोड व्यवसाय म्हणून मागणीनुसार तांबापितळेची भांडी बनविणे व विक्री करणे हा पूर्वपार व्यवसाय सांभाळीत आहेत. तांबापितळेची भांडी बनविणे व्यवसायात झालेल्या पिछेहाटीने येथील त्वष्टा कासार समाज नोकरी व व्यवसायाचे निमित्ताने विखुरला गेला आहे.

# सावध ऐका 'बिहारी' हाका

बिहारमध्ये येत्या नोव्हेंबरात विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यासाठी नरेंद्र मोदींचे दौरे वगैरे तर आहेतच. पण भाजप-छाप इतर भानगडींना आताच सुरुवात झाली आहे. निवडणूक आयोगाने ज्या रीतीने तेथील मतदारयाद्यांच्या तपासणीला प्रारंभ केला आहे तो निर्णय संशयास्पद आहे. एरवी आयोग निवडणुका आल्या की नेहमीच त्या त्या ठिकाणी मतदारयादी तपासणी, परीक्षण तसेच नवीन नावांचा समावेश करणे असा कार्यक्रम राबवते. पण बिहारमधील मोहिम त्याहून वेगळी आहे. त्यानुसार आता सर्व मतदारांना नव्याने अर्ज भरून द्यावा लागणार आहे. याखेरीज अनेक मतदारांना त्यांच्या मातापित्यांच्या जन्माचा दाखल द्यावा लागणार आहे. इतरही अनेक बारीकसारीक किचकट नियम आहेत. निवडणुकीला जेमतेम चार महिने राहिलेले असताना इतका व्यापक परीक्षण कार्यक्रम राबवण्याची काय गरज आहे असा विरोधकांचा सवाल आहे. राहुल गांधी व इतर नेत्यांनी आयोगाने हा निर्णय मागे घ्यावा असे आवाहन केले आहे. निवडणूक आयोगाचे म्हणणे असे आहे की, वाढते नागरीकरण, स्थलांतर इत्यादी कारणांमुळे ही यादी तपासली जात आहे. अनेक जण एका शहरातून दुसरीकडे स्थलांतरित झाल्यानंतरही जुन्या ठिकाणचे आपले नाव मतदारयादीतून कमी करीत नाहीत. एकेका मतदाराचे नाव दोन किंवा तीन ठिकाणी राहते. यातून दुहेरी वा बोगस मतदानाची शक्यता वाढते. आयोगाचे म्हणणे रास्त असले तरी हे परीक्षण गेल्या वर्षीच करणे शक्य होते. आता शेवटच्या क्षणी ते केल्याने बरेच गोंधळ होण्याची शक्यता आहे. असंख्य मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता आहे. आपली एकूणच सरकारी यंत्रणा अत्यंत ढिसाळ तसेच भ्रष्ट आहे. त्यामुळे सत्ताधारी राजकारणी, म्हणजेच भाजपवाले आणि नीतीशकुमार यांच्या पक्षाचे नेते, आपल्याला नको असलेली मतदारांची नावे वगळण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याची भरपूर शक्यता आहे. यापूर्वी एकेका विभागातील मतदारांची नावे यादीतून गायब असल्याच्या असंख्य घटना देशभरात घडलेल्या आहेत. त्याबाबत एकाही अधिकाऱ्यावर आजतागायत कारवाई झालेली नाही. अशा स्थितीत बिहारसारख्या नेहमी अशांत असलेल्या व गुंडपुंडांचा सुळसुळाट असलेल्या राज्यात मतदारयादी शुध्द करण्याचा हा जो घाट घातला गेला आहे तो शंभर टक्के संशयास्पद आहे.

## आयोगाच्या किचकट कसोट्या

आयोगाच्या या परीक्षणासाठी ज्या कसोट्या लावल्या आहेत त्या गरीब व सामान्य नागरिकांची परीक्षा पाहणाऱ्या आहेत. त्यानुसार जुलै १९८७ पूर्वी जन्म झालेल्यांना नेहमीप्रमाणे पासपोर्ट इत्यादी दाखले देऊन भागणार आहे. १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ या काळात जन्म झाला असेल तर त्या मतदारांना आपल्या दाखल्यासोबतच आई किंवा वडिलांपैकी किमान एकाचा जन्म दाखला द्यावा लागणार आहे. म्हणजेच आज जे २१ ते ३८ वर्षांचे असतील त्यांना आपल्या आईबापांपैकी एकाचा जन्मदाखला द्यावा लागेल. त्याहूनही कहर म्हणजे जे २००४ नंतर जन्माला आले असतील त्यांना आपली आई व वडील या दोघांचेही जन्मदाखले द्यावे लागतील. महाराष्ट्रातही लवकरच पालिका, जिल्हा परिषदा इत्यादींच्या निवडणुका होणार आहेत. त्यावेळी हे नियम लागू होऊ शकतात व आईवडिलांचे जन्मदाखले गोळा करण्यासाठी मतदारांची पळापळ होऊ शकते. बिहार हे अतिशय मागास राज्य आहे. तेथे निरक्षरतेचे व गरिबीचे प्रमाण मोठे आहे. जातीयता आजही भयंकर आहे. खेड्यापाड्यातील गरीब व दलित जातींचे लोक सरकारी यंत्रणेपर्यंत वा यंत्रणा त्यांच्यापर्यंत पोचत नाही. अशा स्थितीत अगदी नव्याने मतदार होणाऱ्यांचे स्वतःचे दाखले मिळवतानाही तारांबळ होण्याची शक्यता आहे. तिथे मतदारांना आईबापांचे दाखले द्यायला सांगणे हा एखाद्या मोठ्या कारस्थानाचा तर भाग नाही ना असा संशय घेण्यास जागा आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये गेल्या वर्षी असे कारस्थान झाले असा अनेकांचा वहीम आहे. याबाबतचे खटले न्यायालयांनी फेटाळले असले तरी लोकांच्या मनातील संशय फिटलेला नाही. लोकसभा ते विधानसभा निवडणुकांच्या पाच महिन्यांच्या काळात नवीन मतदारनोंदणीमध्ये विक्रमी संख्येने झालेली वाढ आणि मतदानाच्या दिवशी संध्याकाळी वेळ संपल्यानंतर तब्बल ७४ लाख लोकांनी केलेले मतदान या दोन मुद्द्यांचा खुलासा राहुल गांधी व इतरांनी निवडणूक आयोगाकडे मागितला आहे. पण याबाबतच्या याद्यांचा तपशील द्यायला अद्यापपर्यंत तरी आयोगाने टाळाटाळ केली आहे.

## भाजप के पास आयोग है

त्यातच अलिकडे आयोगाने निवडणुकीसंदर्भातले चित्रीकरण मतमोजणीनंतर ४५ दिवसांमध्ये नष्ट करण्यात येईल असा नवीन नियम बनवला आहे. म्हणजे त्या संबंधात नंतर कोणाला आक्षेप घ्यायचा असेल तर हे फुटेज किंवा चित्रीकरण उपलब्धच असू शकणार नाही. निवडणूक आयोगाने निःपक्ष असणे अपेक्षित असते. पण भाजपच्या काळात नरेंद्र मोदींच्या भाजपसाठी आयोगाने वाटेल तसे नियम वाकवल्याचे अनेकदा दिसले आहे. महाराष्ट्रातील विधानसभेच्या धक्कादायक निकालानंतर मतदारयाद्यांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत आयोगाने टाळाटाळ केली आहे. समजा भाजपने काही मुद्दे उपस्थित केले असते तर आयोगाने हेच केले असते काय याचा विचार करून पाहावा. महाराष्ट्रात स्वबळाचे सरकार आणणे हे भाजपचे स्वप्न आहे. गेल्या वर्षी ते जवळपास पूर्ण झाले. ओरिसातही त्यांचे राज्य आले. आता बिगर-द्रवीड प्रांतांपैकी केवळ बिहार, झारखंड व बंगाल हेच तीन प्रांत असे आहेत की भाजप तिथे अजूनही शतप्रतिशत सत्तेपासून दूर आहे. बिहारमध्ये लालू व तेजस्वी यादवांच्या राष्ट्रीय जनता दलाने भाजपचा रस्ता अडवून धरला आहे. गेल्या वेळी राजदने ७७ जागा मिळवल्या होत्या. पण गेल्या वर्षीच्या लोकसभेत राजद व काँग्रेस युतीचा दारुण पराभव झाला होता. यंदा मात्र नितीश यांच्या विरोधात मोठी नाराजी आहे. आगामी मुख्यमंत्री कोण असावा याबाबत सीव्होटरने अलिकडेच केलेल्या सर्वेक्षणात तेजस्वी यादव हे सर्वात आघाडीवर असून त्यांना ३४ टक्के मते मिळाली. प्रशांत किशोर हे दुसऱ्या तर नीतीशकुमार हे तिसऱ्या स्थानावर असले तरी तेजस्वी यांच्यापेक्षा ते खूप मागे आहेत. याचाच अर्थ भाजपकडे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा नाही. पण तो नसला तरी त्याच्याकडे निवडणूक आयोग आहे. त्यामुळे त्याला बहुदा चिंता नसावी. आयोगाने सुरु केलेल्या मतदारयादी तपासणी मोहिमेत जुनी नावे वगळली जात नाहीत ना हे पाहतानाच नवीन बनावट नावे घुसवली तर जात नाहीत ना यावर आता राजद, काँग्रेस व इतर विरोधी पक्षांना लक्ष ठेवावे लागणार आहे. त्यांच्या बूथस्तरावरच्या कार्यकर्त्यांना यासाठी डोळ्यात तेल घालून पाहारा द्यावा लागेल. आजवर या किंवा त्या लाटेवर निवडणुका लढवण्याची व जिंकण्याची सवय या पक्षांना लागली आहे. ती सोडून द्यावी लागणार आहे. महाराष्ट्र व हरियाणामध्ये काँग्रेसने विजयाच्या जबड्यातून पराभव खेचून आणला असे म्हटले जाते. बिहारमध्ये सर्वच विरोधकांना सावध राहावे लागेल. पुढे महाराष्ट्रातही हाच बिहारी कित्ता गिरवावा लागेल.

---

विचार

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक

***प्रेक्षकांना उपशीर्षके वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे वाटते. लहान मुले किंवा नीट वाचू न शकणाऱ्यांसाठी डबिंग जास्त उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. एआय तंत्रज्ञान या क्षेत्रात घडवत असलेल्या करामतीचा मागोवा.***

**डॉ. दीपक शिकारपूर**




ऑटोमेशन' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अॅनॅलिटीक्स हे उद्याच्या तंत्रजीवनपद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला 'इंटेलिजंट कॉप्युटिंग' असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान आपल्या जगण्याच्या कल्पनाच बदलेल. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वात वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट-कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्लू-कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आत्तापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आरामदायक वाटते. विशेषतः, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे . आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषेत प्रदर्शित केले जातात .

डबिंग ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये अनेक टप्पे असतात. सर्वात आधी मूळ चित्रपटातील संवाद दुसऱ्या भाषेत अचूकपणे भाषांतरित केले जातात. हे काम व्यावसायिक भाषांतरकार करतात, जे दोन्ही भाषा आणि चित्रपटाच्या सांस्कृतिक संदर्भांचे जाणकार असतात. भाषांतर केलेले संवाद पडद्यावर बोलणाऱ्या कलाकारांच्या ओठांच्या हालचालींशी जुळतील अशा प्रकारे तयार केले जातात. यासाठी शब्दांची निवड आणि वाक्यांची रचना काळजीपूर्वक करावी लागते. प्रत्येक पात्रासाठी योग्य आवाज असलेल्या कलाकारांची निवड केली जाते. हे कलाकार मूळ कलाकारांच्या आवाजाशी मिळताजुळता किंवा त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा आवाज देतात. यासाठी ऑडिशन्स घेतल्या जातात. निवडलेले आवाज देणारे कलाकार स्टुडिओमध्ये जातात आणि पडद्यावर चित्रपट पाहताना भाषांतरित संवाद मायक्रोफोनवर रेकॉर्ड करतात. त्यांना मूळ कलाकारांच्या अभिनयाची आणि वेळेची जुळवाजुळव करावी लागते. रेकॉर्ड केलेले आवाज मूळ चित्रपटातील आवाजाच्या जागी व्यवस्थित जोडले जातात. आवाजाची गुणवत्ता, पार्श्वसंगीत आणि इतर ध्वनी प्रभावांची काळजी घेतली जाते, जेणेकरून डब केलेला भाग नैसर्गिक वाटेल. प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात, डब केलेले संवाद, संगीत आणि ध्वनी प्रभाव एकत्र मिसळले जातात. यामुळे संपूर्ण चित्रपट एकसंध आणि प्रभावी वाटतो. डबिंग करताना मूळ चित्रपटातील भावना, पोत आणि अभिनयाचा अंदाज कायम राखणे महत्त्वाचे असते. चांगल्या डबिंगमुळे प्रेक्षकांना चित्रपट इतर प्रदेशातील आहे असे वाटत नाही आणि ते कथेमध्ये पूर्णपणे सामील होऊ शकतात.

आज स्डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय-आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. 'टेक्स्ट-टू-स्पीच' तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडिओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप-सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो. इथे एक उदाहरण देता येते. 'वॉच द स्काय' हा स्वीडिश चित्रपट व्हिज्युअल डबिंग नावाच्या तंत्राचा वापर करून कलाकारांच्या ओठांच्या हालचालींमध्ये बदल करत असून एकही दृश्य पुन्हा शूट न करता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी डब केलेल्या इंग्रजी संवादांनुसार मॅप करत आहे.

लॉस एंजेलिस येथिल 'फ्लॉलेस' ही चित्रपटनिर्माती एआय फर्म आणि त्यांच्या ट्रूसिंक तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले आहे. ते अभिनेत्याच्या संपूर्ण कामगिरीचे विश्लेषण करते, त्यांच्या चेहऱ्याचे व्हॉल्यूमेट्रिक ३ प्रतिनिधित्व तयार करण्यासाठी डीप लर्निंगचा वापर करते आणि नंतर पोस्ट-प्रॉडक्शनमध्ये फुटेजमध्ये त्यांच्या तोंडाच्या हालचाली अनुकूल करते. डबिंगच्या क्षेत्रात एआय एक शक्तिशाली साधन म्हणून उदयाला आले आहे. यामुळे भाषांतर, आवाज संश्लेषण आणि लिप-सिंकसारख्या प्रक्रियांमध्ये सुधारणा झाली आहे. यामुळे चित्रपटनिर्मात्यांना जागतिक स्तरावर मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे आणि प्रभावी झाले आहे. तथापि, भावनात्मक बारकावे आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांसारख्या काही क्षेत्रांमध्ये अजूनही मानवी हस्तक्षेपाची गरज भासते. त्यामुळे भविष्यात एआय आणि मानवी सहकार्याने डबिंगची प्रक्रिया अधिक परिपूर्ण होईल यात शंका नाही.

एआयमुळे व्हीएफएक्स आणि डबिंगमध्ये अनेक फायदे असले तरी काही आव्हाने देखील आहेत. एआयमुळे काही कामे स्वयंचलित होत असल्याने कलाकारांच्या आणि डबिंग कलाकारांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची भीती आहे. तथापि, अनेक तज्ज्ञांचे मत आहे की एआय मानवी सर्जनशीलतेची जागा घेणार नाही, तर एक शक्तीशाली साधन म्हणून काम करेल. यामुळे कलाकार अधिक सर्जनशील कामांवर लक्ष केंद्रित करू शकतील.

या पार्श्वभूमीवर डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर, सिंथेटिक आवाजांची संमती आणि सांस्कृतिक गैरसमज यासारख्या नैतिक मुद्द्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. पूर्णपणे एआय-आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम-चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल.

deepak@deepakshikarpur.com

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

चर्चा आजची

# पिकविम्यासाठी नियोजनाची गरज

**प्रमोद जाधव**

आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ देण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरु केली आहे. नोंदणी करण्यासाठी ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी करण्यात आली आहे. मात्र एक हजार ५६८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे या नोंदणीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविल्याचे आकडेवारीनूसार दिसून आले आहे. खरीप हंगामातील पिक विम्यासाठी प्रचार व प्रसाराची गरज आहे. सध्या भात लावणीचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे शेतकरी लावणीच्या कामात मग्न आहेत. लावणीची कामे वेळेत होण्यासाठी शेतकरी कामाला लागला आहे. त्यामुळे पिक विम्याची माहिती देण्यासाठी अगोदर नियोजन करणे गरजेचे आहे.

रायगड जिल्हयामध्ये खरीप हंगामात शेतकऱ्यांना फटका बसतो. वादळी पावसासह अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना पिकविम्याचा आधार देण्याचा प्रयत्न सरकारने केला. प्रधानमंत्री पिक विम्यासाठी पुर्वी एक हजार रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून प्रतिसाद कमी मिळाला. होता. केवळ तीन हजारहून अधिक शेतकऱ्यांनीच या योजनेत सहभाग घेतला होता. त्यामुळे एक रुपयांमध्ये पिकविमा उतरविण्याचा निर्णय घेतला. त्याची जनजागृतीदेखील मोठ्या प्रमाणात झाली. एक रुपयात पिक विमा उतरविण्याच्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. एकूण ६४ हजार २२९ शेतकऱ्यांनी पिक विमा उतरविला होता. त्यामध्ये बिगर कर्जदार ४९ हजार ८०३ व कर्जदार १४ हजार ४२६ होते. या उपक्रमाला गतवर्षीदेखील चांगला प्रतिसाद मिळाला होता. ४० हजारहून अधिक शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता.

पेरणी न होणे, पुर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान,गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण देण्याचा निर्णय यावर्षीदेखील घेण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यांसाठी भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ६१ हजार रुपये असून नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३५ हजार रुपये आहे. ई-पीक पहाणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. या योजनेंतर्गत भातासाठी एक एकर क्षेत्राकरिता १८३ रुपये, एक हेक्टर क्षेत्रासाठी ४५७ रुपये हप्ता आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नाचणी पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एक एकर क्षेत्रासाठी ३५ रुपये व एक हेक्टर क्षेत्रासाठी ८७.५० रुपये हप्ता आहे. पिक विम्याची नोंदणी करण्यासाठी जनजागृती करण्यात आली आहे. शेतावर जाण्यापासून वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून पिक विमा नोंदणीचे आवाहन करण्यात आले. वेगवेगळे फलक तयार करण्यात आले आहे. मात्र या कंपनीचा प्रयत्न अपयशी ठरला आहे.

प्रधानमंत्री पिक विमा या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ करीता शेतकरी नोंदणीसाठी दि.३१ जुलै अंतिम तारीख आहे. २२ जूलैपर्यंत एक हजार ५६८ शेतकऱ्यांनी पिक विमा नोंदणी केली आहे. अपेक्षेपेक्षा फारच कमी नोंदणी झाल्याचे चित्र आहे.यंदा भात पिकासाठी विमा संरक्षीत रक्कम ६१ हजार असून एक एकर क्षेत्रासाठी १८३ व हेक्टर क्षेत्रासाठी ४५७ रुपये हप्ता ठेवण्यात आला आहे. तसेच नाचणी पिकासाठी विमा संरक्षीत रक्कम ३५ हजार रुपये असून एक एकर क्षेत्रासाठी ३५ रुपये आणि हेक्टर क्षेत्रासाठी ८७.५० रुपये हप्ता ठेवण्यात आला आहे.

पिक विम्यासाठी दरवर्षी सरकारच्या भूमिका बदलत आहेत. त्यामुळे कधी एक रुपयात कधी, एक हजार रुपयात तर कधी ३५ ते ४५७ रुपयांत विमा उतरविण्याचा निर्णय घेतला जात आहे. सरकार आपल्या सोयीनुसार निर्णय घेत असले तरी त्याचा परिणाम शेतकऱ्यांवर होत असल्याचे चित्र आहे. मागील वर्षी झालेल्या नुकसानीच्या विम्याची रक्कम मिळाली नसल्याने विमा का उतरावा असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना बसत आहे. विमा उतरविण्यासाठी इन्सुरन्स कंपनी कृषी विभागाच्या मदतीने गावोगावी जात आहे. शेतकऱ्यांना भेटून विमा उतरविण्याचे आवाहन करीत आहे. तरीदेखील दीड ते दोन हजार शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळणे ही बाब चिंताजनक बाब आहे. विमा उतरविण्यासाठी शेतकरी संख्या वाढावी यासाठी आता बँकाना टारगेट करण्यात आले आहे. बँकाच्या मदतीने कर्जदार शेतकऱ्यांची माहिती घेऊन त्यांच्या खात्यातून परस्पर विम्याचा हप्ता वसूल केला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. विमा शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने फायदेशीर आहे. मात्र त्याचे योग्य नियोजन करण्याबरोबरच नव्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे ही गरजेचे आहे. तरच विम्याचे महत्व अधिक जनतेमध्ये पटण्यास मदत होईल.

---

लोकसंसद

## हातरिक्षाची अमानवीय पद्धत बंद व्हावी

पर्यावरणदृष्टया संवेदनशील असलेले माथेरान हे महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण असून तेथील अढळ निसर्ग सौंदर्यामुळे दरवर्षी लाखो पर्यटक माथेरानला भेट देतात. परंतु आजही माथेरानमध्ये पर्यटकांच्या वाहतुकीसाठी हाताने ओढल्या जाणाऱ्या हातरिक्षांचा वापर केला जातो. हातरिक्षाच्या साहाय्याने माणसाने माणसाला ओढणे ही पद्धत अमानवीय असल्याचे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला हातरिक्षा चालकांना सामावून घेणारी पर्यायी वाहतूक व्यवस्था शोधण्याचे निर्देश नुकतेच दिले. तसेच राज्य सरकारने यासाठी गुजरातमधील सरदार सरोवर धरण परिसरात वापरात आणलेल्या ई-रिक्षा वाहतूक व्यवस्थेचा विचार करावा असे सुचवले आहे. वास्तविक संपूर्ण देशात कोलकाता व्यतिरिक्त माथेरान हे एकमेव ठिकाण आहे जिथे अमानवीय पद्धतीने हाताने ओढलेल्या रिक्षा किंवा गाड्या अजूनही सुरू आहेत. माथेरानमध्ये ई-रिक्षाच्या माध्यमातून हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन करणे शक्य असून माथेरानमध्ये काही हातरिक्षा चालकांना प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षाची परवानगी देण्यात आली होती. त्याच धर्तीवर उर्वरित सर्वच हातरिक्षा चालकांना ई-रिक्षाची परवानगी मिळाली तर माणसाने माणसाला हाताने ओढल्या जाणाऱ्या हातरिक्षाची अमानवीय प्रथा लवकर संपुष्टात येईल.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## थकीत बिलापोटी संपलेलं जीवन

सांगली जिल्ह्यातील तांदूळवाडी गावातील ३५ वर्षीय कंत्राटदार हर्षल पाटील यांनी आत्महत्या केली. जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याचं काम केलं होतं, पण सरकारकडून सुमारे १.४ कोटी रुपयांची बिले थकीत होती. सावकारांचे कर्ज, वाढतं व्याज आणि थकीत बिलाचे येणे बाकी या सगळ्याचा ताण इतका असह्य झाला, की हर्षलने स्वतःचं आयुष्य संपवलं. ही घटना केवळ वैयक्तिक शोकांतिका नाही. ती आहे सरकारी उदासीनतेचा आणि व्यवस्थेच्या ढिसाळपणाचा आरसा. काम पूर्ण, दस्ताऐवज पूर्ण तरीही महिनोनमहिने बिले मिळत नाहीत. या निमित्ताने प्रश्न उभा राहतो बिले इतकी थकीत का राहतात? त्यांची जबाबदारी कोणाची? आणि जर वेळेवर पैसे दिले असते, तर हर्षल आज जिवंत राहिले असते का?सरकार सांगतं, "तो थेट कंत्राटदार नव्हता." म्हणजे काय? सब-कंत्राटदारांना न्याय मिळायचा नाही का?

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

दिनविशेष

# कारगिल विजय दिवस

१९९९ मध्ये कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. युद्धादरम्यान, भारतीय लष्कराने पाकिस्तानी घुसखोरांना हाकलून लावले आणि ङ्घऑपरेशन विजयङ्घ चा भाग म्हणून टायगर हिल आणि इतर सर्व चौक्यांवर कब्जा करण्यात भारतीय सैनिकांना यश मिळवले होते .ही लढाई लडाखच्या कारगिलमध्ये ६० दिवसांहून अधिक काळ भारत विरुद्ध पाकिस्तान युद्ध सुरु राहिले आणि शेवटी या लढाईत भारताने युद्ध जिंकले. दरवर्षी या दिवशी कारगील युद्धात शहीद झालेल्या शेकडो भारतीय जवानांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. आणि भारतीय सशस्त्र दलाच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी देशभरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजित केले जाते.

२६ जुलै १९९९ चा तो दिवस भारतीय लष्कराच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला गेला आहे. या दिवशी भारताने जगातील सर्वात कठीण युद्धांपैकी एक म्हणजे कारगीर युद्ध जिंकले आहे.

१९७१ च्या भारत-पाक युद्धानंतर दोन्ही देशांमध्ये अनेक सशस्त्र युद्धे झाली आहेत. १९९८ मध्ये दोन्ही देशांनी अणुचाचण्या घेतल्या होत्या. लाहोर घोषणेने काश्मीर समस्येवर शांततापूर्ण तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते, ज्यावर दोन्ही देशांनी फेब्रुवारी १९९९ मध्ये स्वाक्षरी देखील केली होती. पण पुढे नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानने भारतीय हद्दीत घुसखोरी केली होती. याच घुसघोरीला ऑपरेशन बदर असे नाव देण्यात आले होते. लगेच भारत सरकारने या घुसघोरीला प्रत्युत्तर देण्यासाठी मऑपरेशन विजयफ सुरू केले आणि सुमारे दोन महिन्यांच्या मोठ्या युद्धासाठी २ लाख भारतीय सैनिकांना एकत्र जमवले. हे युद्ध मे ते जुलै १९९९ दरम्यान जम्मू-काश्मीरमधील कारगिल जिल्ह्यात सुरू झाले होते. त्यावेळचे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांनी देशाचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना न कळवता युद्धाची योजना आखली होती असे सांगितले जाते.

सुरुवातीच्या काळात पाकिस्तानने भारताच्या ताब्यातील काश्मीरमधील भाग ताब्यात घेतला. युद्धाच्या दुसऱ्या टप्प्यात, भारताने प्रथम सामाईक वाहतूक मार्ग काबीज करून प्रत्युत्तर दिले. स्थानिक मेंढपाळांनी दिलेल्या गुप्त माहितीच्या आधारे भारतीय लष्कराला हल्ल्याचे ठिकाण ओळखता आले. अंतिम टप्प्यात भारतीय लष्कराने भारतीय हवाई दलाच्या मदतीने शत्रूवर तुटून पडले,आणि जुलैच्या शेवटच्या आठवड्यात या युद्धाची सांगता झाली. कारगिल युद्धात पाकिस्तानी लष्कराचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मात्र ही गोष्ट मान्य करण्यास पाकिस्तानने नेहमीच नकार दिला आहे. पण नंतर अशी अनेक तथ्ये युद्धादरम्यान आणि युध्दानंतरही समोर आली आहेत ,ज्यात सिद्ध झाले की पाकिस्तानी लष्कराने घुसखोरांना मदत केली होती. तेव्हा नवाझ शरीफ हे मदतीसाठी अमेरिकेच्या वॉशिंग्टनलाही गेले होते. मात्र त्यावेळी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानला मदत करण्यास स्पष्ट नकार दिला होता.

२६ जुलै १९९९ रोजी सैन्याने मिशन यशस्वी झाल्याचे घोषित केले. पण या विजयाची खूप जास्त किंमत भारतीय सैन्याला मोजावी लागली हे मात्र खरं आहे. या युद्धात भारतीय सैन्यातील शूर सैनिकांपैकी एक असलेले कॅप्टन विक्रम बत्रा हे या युद्धात शहीद झाले होते. नंतर बत्रा यांना मरणोत्तर परमवीर चक्र, भारताचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. अलिकडेच विक्रम बत्रा यांच्या जीवनावर आधारित शेरशाह नावाचा चित्रपट बनवण्यात आला आहे.

# ‘जात प्रमाणपत्राची अट शिथिल करा’

**खरोशी :** जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या अर्जासाठी ओबीसीसह एस.सी. व एस. टी.चे संबंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र लागत असते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्रे घेतली जातात. पण, यापैकी जात प्रमाणपत्र मात्र फॉर्म भरताना लागत असल्याने पालकांची धावपळ होत असे या प्रश्नाबाबत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात आले होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हितासाठी ओबीसीसह एससी व एसटीच्या ही जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व सर्वांना समान न्याय द्यावा, अशी विनंती संघटनेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी दिली.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे निवळे ता.श्रीवर्धन जि.रायगड येथील

| अ.क्र. | गट क्र. | लागवड योग्य क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | १/१क | १.०१.९० | ०.०५.८० | १.०७.७० | ०.६७ |

**मालकाचे नाव:- जतीन नथुराम दिवेकर, प्रज्ञा नथुराम दिवेकर, शैली नथुराम दिवेकर, निकिता नथुराम दिवेकर, आनंदी पांडुरंग दिवेकर.**

यांचे कडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याचे बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहीवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालया कडून योग्य ती सर्व परवानगी मिळवून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. वरील मिळकतीच्या बाबत कुणाची ही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यार पत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षीसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (सक्षम अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजा विरहित आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाची हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : श्रीवर्धन
दि. २५/०७/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.ग.स.कातकर सभागृह, गाळा नं २
वाणी आळी श्रीवर्धन ता.श्रीवर्धन जि.रायगड

सही/-
**(ॲड.संतोष मारुती सापते)**
बीएससी.एल.एल.बी.एम ए बी एड
डिप्लोमा इन सायबर

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे श्रीवर्धन ता.श्रीवर्धन जि.रायगड येथील

| अ.क्र. | गट क्र. | लागवड योग्य क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१२/१/ब/२/अ/३ | ०.२३.९० | ०.०२.५० | ०.२६.४० | ४.५६ |

**मालकाचे नाव:- श्री.वसंत भिकू चोगले**

यांचे कडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याचे बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहीवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालया कडून योग्य ती सर्व परवानगी मिळवून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. वरील मिळकतीच्या बाबत कुणाची ही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यार पत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षीसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (सक्षम अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजा विरहित आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाची हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : श्रीवर्धन
दि.२५/०७/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.ग.स.कातकर सभागृह, गाळा नं २
वाणी आळी श्रीवर्धन ता.श्रीवर्धन जि.रायगड

सही/-
**(ॲड.संतोष मारुती सापते)**
बीएससी.एल.एल.बी.एम ए बी एड
डिप्लोमा इन सायबर

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातघर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.१२, क्षेत्र ० हेक्टर ३० आर ही मिळकत, त्या मिळकतीचे मालक श्री.इब्राहिम हुसेन कुरेशी यांनी आमचे अशिलांना कायम मालकी हक्काने विकत देण्याबाबतचा साठेकरार केला आहे. साठेकरारामध्ये ठरलेल्या एकूण विक्री किंमतीपैकी अंशदानाची रक्कम म्हणून श्री.इब्राहिम हुसेन कुरेशी यांनी आमचे अशिलांकडून काही रक्कम देखील स्विकारली आहे. उर्वरित रक्कम खरेदीखताचेवेळी देणेस आमचे अशिल तयार आहेत.

आमचे अशिल हे सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यास सदैव तयार व उत्सुक आहेत. असे असताना श्री.इब्राहिम हुसेन कुरेशी व्यवहार पुर्ण करण्यास जाणून-बुजून टाळाटाळ करीत आहेत असे आमचे अशिलांचे निदर्शनास आले आहे. तसेच ते सदर मिळकतीचा विक्री व्यवहार अन्य व्यक्तींबरोबर करणेच्या तयारीत असल्याचे आमचे अशिलांस समजले आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, मौजे सातघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.१२, क्षेत्र ० हेक्टर ३० आर या मिळकतीसंदर्भात श्री.इब्राहिम हुसेन कुरेशी यांचेबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, तसा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही. तसेच, आमचे अशिल संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २६/०७/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
‘वत्सल्य’ टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आगरसुरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकती श्री.रमेश गणपत म्हात्रे, श्री.विजय गणपत म्हात्रे, श्री. नरेश गणपत म्हात्रे, राहणार आगरसुरे, ता.अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.रमेश गणपत म्हात्रे, श्री.विजय गणपत म्हात्रे, श्री.नरेश गणपत म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आगरसुरे ता.अलिबाग. | १५२ | ०-१२-००<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-१६-०० | ००-२० |
| आगरसुरे ता.अलिबाग. | १५३ | ०-०७-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-०८-०० | ००-१० |

अलिबाग,
दिनांक : २५/०७/२०२५.

सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे मालक श्री.मुलजीभाई रवजीभाई पटेल, दिपक मणिलाल पटेल व मारुती डेव्हलपर्स तर्फे भागीदार यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील बिनशेती मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे-बोपले, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०१०१ येथील बिनशेती मिळकत.

| भूमापन क्रमांक व उपविभाग | बिनशेती क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ५२/८ | ५.३५.०० | ५३.५० |

तरी बिनशेती मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २६/०७/२०२५

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
४१०१०१, मो.नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री.एकनाथ नथु लदगे यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे-आसलपाडा, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील शेतजमिन मिळकत व त्या जमिनीमध्ये खालील वर्णन केलली सर्व मिळकत :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| २१/१ब | ०.३६.२०<br>पो.ख.०.०३.८०<br>एकुण ०.४०.०० | १.४० |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख :२६/०७/२०२५

सही /
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी धामोते. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
४१०१०१, मो.नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अजय कुमार रा.बी/४०२, बालाजी कृपा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.३अे, सेक्टर २८, नेरूळ (प.) नवी मुंबई ४००७०६ यांचेकडुन खाली वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी सुद्धा त्यांच्याबरोबर केली आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

मौजे वरसोली, ता.अलिबाग येथील सर्व्हे नं.२६३ हिस्सा नं.२/१ क्षेत्र ०-२५-८ हे.आर., आकार २.५८ रू.पै, सर्व्हे नं.२६३/1 पैकी प्लॉट नं.१०, क्षेत्र ३९५ चौ.मी. आकार ७.९० रू.पै. व सर्व्हे नं.२६३/१ पैकी प्लॉट नं.११, क्षेत्र ३१० चौ.मी., आकार ६.२० रू.पै., हया बिनशेती मिळकतीवरील ‘‘बे ब्ल्यू’’ या इमारतीमधील सी विंग, ३रा मजला, निवासी सदनिका क्र.३०४, क्षेत्र ५५२ चौ.फुट (बिल्टअप) वरसोली ग्रामपंचायत दप्तरी मालमत्ता क्र.१८१४/१२ असलेली मिळकत.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सात दिवसाच्या मध्ये दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन इतर कोणाचाही कायदेशिर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०७/२०२५

**ॲड. समिक्षा दामू भालकर**
पत्ता : संत रोहिदास नगर, चेंढरे,
ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं. ८९८३९६३१२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमुद शेत मिळकतीचे जागा मालक श्री.रोहिणी यशवंत मणचेकर, श्री.महेश यशंवत मणचेकर, श्री.लक्ष्मण भैरू भांगरे, श्री.मनिष नारायण चाळके, श्री.विनोद तानाजी निकम यांचे मालकीची आहे. खालील परिशिष्टात नमुद मिळकतीचे संदर्भात आमचे अशिल व जागा मालक यांचेमध्ये दिनांक २४.०२.२०२५ रोजी जागा विक्री-व्यवहारसंदर्भात करारनामा केला होता व आहे. सदर करारनामामधील अटी व शर्तीप्रमाणे आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात नमुद मिळकत खरेदी व्यवहाराकरीता जागा मालक श्री.लक्ष्मण भैरू भांगरे यांचे स्वतःच्या खातेवर एन.एफ.टीद्वारे रक्कम भरणा केलेला आहे व उर्वरीत जागा मालक यांस डिमांड ड्राफ्टने रक्कम अदा केलेल्या होत्या व आहेत. सदर मिळकतीचे मालक यांनी ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे रक्कमा स्विकारल्या परंतू सदर मिळकतीचे खरेदीखत करून देणेस टाळाटाळ करीत आहेत. अशा प्रकारे आमचे अशिलांची घोर फसवणूक केलेली आहे. सदर मिळकत संदर्भात आमचे अशिल सक्षम दिवाणी व फौजदारी न्यायालयात दाद मागणार आहेत. खालील मिळकतीबाबत वर नमुद व्यक्ती व त्यांचे वालींवारस इ.सोबत कोणीही, कसलाही व्यवहार करू नये, याउपर कोणी व्यवहार केल्यास तो आमचे अशिल व खालील परिशिष्टात नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन:**

जिल्हा रायगड तालुका अलिबाग यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा मिळकत, गाव-सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट क्र.२९४ ही शेत मिळकत जागा मालक यांचे खुद्द मालकी हिस्स्याचे क्षेत्र हे.०.१२.३० आर.चौ.मी.व पोट खराब हे ०.००.५०.आर.चौ.मी.असे एकूण क्षेत्र हे.०.१२.८०.आर.चौ.मी.यांसी आकार ३ रू.४३ पैसे ही शेत मिळकत असे.

सबब ही जाहीर नोटीस दिली असे
आज मु.अलिबाग
दिनांक : २४.०७.२०२५

अशिलातर्फे वकील
**चैतन्य सुनिल खंदारे**
ऑफीस-१३१७ दलामाल टॉवर,
फ्री प्रेस मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई
Email- chaitanyk7776@gmail.com
मोबा. ७७७००५१४६०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोल्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक अनंत तुकाराम म्हामुणकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-नावंढे तालुका खालापुर जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| भुमापन क्र व उपविभाग / प्लॉट क्रमांक | एकुण क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १२८/२६ | २.७८.०० आर चौ मीटर | २७.८० रु पै |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड. कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विश्वास कृष्णा कदम व शिरीष कृष्णा कदम यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-साळोख तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २०/१ | एकुण क्षेत्र २-१५-५० हे आर पॉ | २१-८९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड. कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक गुलाब काशिनाथ सावंत व इतर ६ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - कामतपाडा तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५७/१/अ/१ | एकुण क्षेत्र ०-९२-५० हे आर पॉ | ०-६८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड. कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.सुनित महादेव वार्डे, मु.पो.वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या कुळ हक्काची व खुद्द मालकी व ताबेकब्जा वाहीवाटीची खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**-मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र हे.आर | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग | ८७/३ | ०-२५-०२ | ९.१९ |

सदर वर वर्णनांकीत मिळकत आमचे अशिल श्री.सुनित महादेव वार्डे व त्यांच्या दिवंगत आई पार्वती महादेव वार्डे यांच्या कुळ हक्काची तसेच मालकी व ताबेकब्जा वहीवाटीची असून, सदर वर नमुद मिळकतीच्या इतर अधिकारांत आमचे अशिल व त्यांचे आईचे नाव साधे कुळ म्हणून फेरफार नोंद क्र.२४३७ अन्वये नमुद आहे. सदर मिळकतीवर कुळ हक्क ताबेकब्जा व वहीवाट हक्क व मालकी असताना आमच्या अशिलांचा हक्क डावलून सदर मिळकत परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतींबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. या उपरही सदर मिळकतींबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २६/०७/२०२५

सही/-
**ॲड.विक्रांत वि.पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.

जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग.

**वाढीव मिलर्स अल्पमुदतीची निविदा**

शासकिय आधारभूत किंमत धान खरेदी योजने अंतर्गत रायगड जिल्ह्यांत सन २०२४-२०२५ मध्ये खरेदी केलेल्या भाताची (धानाची) भरडाई करण्यासाठी जिल्ह्यातील, लगतच्या व इतर जिल्ह्यातील इच्छूक वाढीव मिलधारकांकडून सीलबंद लिफाफयामध्ये ऑफर्स मागविण्यांत येत आहेत. इच्छूक वाढीव मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त FRK मिश्रीत तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. भरडाई करावयाच्या भाता संबंधिच्या अटी व शर्ती तसेच ऑफर्स फॉर्म संबंधीत जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग तथा सदस्य सचिव जिल्हा भात भरडाई समन्वय समिती यांचेकडे कार्यालयीन वेळेत खालील पत्त्यावर प्राप्त होतील. ऑफर भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालील प्रमाणे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी — दि.२६/०७/२०२५ ते दि.२८/०७/२०२५ कार्यालयीन वेळेत
ब) ऑफर्स भरण्याची अंतीम तारीख — दि.२८/०७/२०२५ दुपारी ५ वाजेपर्यंत
क) ऑफर उघडण्याची तारीख — दि.२८/०७/२०२५

**जिल्हा पणन अधिकारी**
**रायगड-अलिबाग.**

पत्ता:
जिल्हा पणन अधिकारी कार्यालय
बाफना बाग बी., रो.हौस नंबर १२,
बिग फ्लॅश हॉटेलच्या मागे, रेवस रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
भ्रमणध्वनी क्र. ९१६८०५९९२५/८४०८८६६६१९

## आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे

**श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय नवीन पनवेल, तालुका पनवेल जि.रायगड**
**(मराठी व इंग्रजी माध्यम )**
**महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई. मान्यता प्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये**
**शासकीय कोटा व व्यवस्थापन कोटा (विशेष प्रवेश फेरी)**
**डी.एल.एड. (डी.एड) प्रवेश २०२५-२६ साठी**
**रिक्त जागांकरिता अर्ज मागवित आहे.**

- शैक्षणिक पात्रता: इ.१२ वी, मागासवर्गीयांसाठी ४४.५०% व खुला गट ४९.५० % गुणांसह उत्तीर्ण.
- MCVC विद्यार्थ्यांना १. कृषी गटातील हार्टीकल्चरल व क्रॉप सायन्स किंवा आरोग्य व वैद्यकीय सेवा गटातील फ्रेंच अँड प्रीस्कूल मॅनेजमेंट विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- YCMOU मधून पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन FYBA किंवा पदवी उत्तीर्ण.

- शासकीय कोटा रिक्त जागा :

| माध्यम | रिक्त जागा |
|---|---|
| मराठी | ०२ |
| इंग्रजी | ११ |

- व्यवस्थापन कोटा रिक्त जागा :

| माध्यम | रिक्त जागा |
|---|---|
| मराठी | ०२ |

उपरोक्त रिक्त जागांनुसार कोणत्याही शाखेतील (कला, विज्ञान, वाणिज्य आणि MCVC) व संवर्गातील उमेदवारास वरील शैक्षणिक निकषानुसार प्राधान्य दिले जाईल. अर्ज विक्री दिनांक २५.७.२०२५ ते २९.७.२०२५ तसेच अर्ज स्वीकृती दिनांक २५.७.२०२५ ते २९.७.२०२५ या कार्यालयीन वेळात १०.३० ते ५.०० पर्यंत राहील. प्रवेश अर्जाची किंमत खुला गट २०० रु. व मागासवर्गीयांसाठी १०० रु. याप्रमाणे असेल. मराठी माध्यमाचे शैक्षणिक शुल्क १५०००/- रु. व इंग्रजी माध्यमाचे शैक्षणिक शुल्क १५०००/- रुपये असेल.

संपर्क
**प्राचार्या**
**श्रीमती मधाळे कुसुम पारिसा**
**श्री.डी.डी.विसपुते अध्यापक विद्यालय**
**प्लॉट नंबर ४१ सेक्टर १५, पनवेल रेल्वे स्टेशन जवळ,**
**नवीन पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**फोन नंबर ९८२१७०४३५०/९०८२५२८५६८/**
**९९६०९३८०६१/९९६९०७६२६७/७७३८६०८०८८**

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

सुधाकर काशिनाथ मोकल(म.त.वा.) ... अपिलार्थी
स्वाती सुधाकर मोकल

**विरूद्ध**

प्रभाकर काशिनाथ मोकल (म.त.वा.) ... उत्तरार्थी
शांता प्रभाकर मोकल

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसमध्ये वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात विलंब माफी अर्ज क्र.३२/२०२५ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मि.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे मांडवखार, ता.अलिबाग | ७८ | १-५५-९० | २०.४३ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

**उत्तरार्थीचे नाव :**

**१. श्री.प्रभाकर काशिनाथ मोकल**
**मयत तर्फे वारस**
**१/१.श्रीम.शांता प्रभाकर मोकल,**
**१/२.श्री.रुपेश प्रभाकर मोकल,**
**१/३. श्री.मनोज प्रभाकर मोकल,**
**१/४. श्री.प्रशांत प्रभाकर मोकल, मयत तर्फे वारस**
**१/४/१. श्रीम.पूर्वा प्रशांत मोकल,**
**१/४/२. भाविका प्रशांत मोकल,**
**१/५. सौ.विस्मया विजय रेवसकर,**
**१/६. सौ.मधु संतोष बिडकर,**
क्र.१/१ ते १/६ रा.मु.चिंचवली, पो.नारंगी,
ता.अलिबाग, जि.रायगड
**२. श्रीम.शारदा परशुराम पाटील**
**मयत तर्फे वारस**
**२/१. श्री.संतोष परशुराम पाटील**
**२/२. श्री.विवेक परशुराम पाटील,**
**२/३. श्री.प्रमोद परशुराम पाटील,**
**मयत तर्फे वारस**
**२/३/१. श्रीम.लता प्रमोद पाटील,**
**२/४. श्रीम.आरती दामोदर तुरे,**
**२/५. श्रीम.अरुणा कृष्णा बोरकर,**
**२/६. श्रीम.रंजना दिगंबर घरत,**
**२/७. श्रीम.श्वेता सुभाष कडवे,**
क्र.२/१ ते २/७ रा.मु.मांडवखार,
पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड
**३. श्रीम.वत्सला उर्फ प्रतिभा प्रभाकर मोरे,**
रा.मु.करमशी डुंगरशी बिल्डींग, डी.एन.पुरव मार्ग,
चुनाभट्टी पोलिस ठाणे जवळ, चुनाभट्टी (पुर्व), मुंबई ४०००२२
**४. श्रीम.सुमती अनंत थळे,**
रा.मु.पळी-कोलटेंभी,
ता.अलिबाग, जि.रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.०४/०८/२०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

# पावभाजीची रंजक गोष्ट



**वाचा तर खरं**

**पंकजा देव**

मित्रांनो, रस्त्याच्या कोपऱ्यांपासून एखाद्या फॅन्सी रेस्टॉरंट्सपर्यंत सगळीकडे पावभाजीचा सुगंध तुमचे लक्ष वेधून घेतो ना? असे असताना तुम्हाला सांगितले गेले की, पावभाजीचा संबंध महाराष्ट्राशी नसून अमेरिकेशी आहे तर विश्वास बसेल का?

पण हे खरं तर. तुमच्या या आवडत्या स्ट्रीट फूडच्या कथेत अमेरिकन यादवी युद्धाचा एक मनोरंजक ट्विस्ट लपलेला आहे. पावभाजीचा जन्म आपल्या मुंबईत झाला असला तरी १८६० च्या अमेरिकन यादवी युद्धाने तिची लोकप्रियता आणि गरज वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात अमेरिकेत यादवी युद्ध सुरू असताना कापसाच्या जागतिक पुरवठ्यावर वाईट परिणाम झाला होता. अशा परिस्थितीत ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील कापसाच्या गिरण्यांना कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे आदेश दिले. स्वाभाविकच मुंबईतील गिरणी कामगारांना कापसाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम करावे लागत होते. त्यांच्या कामाच्या शिफ्ट लांबत होत्या आणि जेवायलाही जास्त वेळ नव्हता. अशावेळी त्यांना लवकर मिळणाऱ्या, पोटभर आणि स्वस्त जेवणाची गरज होती. जेवल्यानंतर लगेचच शारीरिक श्रम करावे लागत असल्यामुळे अन्न हलके असणेही गरजेचे होते. मुंबईच्या रस्त्यावरील हुशार विक्रेत्यांना ही गरज समजली आणि त्यांनी उरलेल्या भाज्या एकत्र करुन, त्यात काही मसाले घातले आणि ब्रेड रोलवर पसरवून सर्व्ह करायला सुरुवात केली. त्या काळात कामगारांसाठी ते एक फास्ट फूड होते. म्हणजेच सुरुवातीला पावभाजी फक्त गिरणी कामगारांचे जेवण होती, परंतु हळूहळू तिची लोकप्रियता वाढत गेली. अनेकांनी पावभाजी हा एक सोपा आणि चविष्ट पर्याय म्हणून स्वीकारला. काही काळातच पावभाजी मुंबईच्या कानाकोपऱ्यात पसरली. करण्यास सोपी, उत्तम चव आणि कमी किमतीमुळे सर्व वर्गातील लोकांमध्ये तिची प्रसिद्ध वाढली.


# ‘ओके’चा इतिहास



**टेक्नो टिप्स**

**उर्मिला राजोपाध्ये**

छोट्या दोस्तांनो, आपण सगळेच एखाद्या गोष्टीला सहमती देताना ‘ओके’ हा शब्द वारंवार आणि अगदी सहजतेने वापरतो. किंबहुना, जगभरात सर्वांना समजणारा हा शब्द आहे. पण याची सुरुवात एका विनोदाने झाली, हे तुम्हाला माहिती आहे का? ओके या शब्दाची उत्पत्ती समजून घेण्यासाठी आपल्याला १८३९ मध्ये जावे लागेल. तेव्हा अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये एक विचित्र ट्रेंड चालत असे. तो म्हणजे जाणूनबुजून चुकीचे स्पेलिंग वापरणे. तर तेव्हा ओके ‘ऑल करेक्ट’ असे लिहिले जायचे जो ‘ऑल करेक्ट’ चा जाणीवपूर्वक चुकीचा लिहिलेला प्रकार होता. १९ व्या शतकात अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये या प्रकारची भाषाशैली प्रचलित होती. विनोदी लेखांमध्ये, ‘ऑल करेक्ट’ हे ‘आल करेक्ट’ असे लिहिले जात असे आणि तेच पुढे ‘ओके’ झाले. त्या काळात वर्तमानपत्रांमध्ये जागेची कमतरता नसली तरीही संक्षेपांचा वापर करण्याची एक फॅशन बनली होती. अर्थात १८४० ची अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक झाली नसती तर ओके हा शब्द कदाचित विसरला गेला असता. पण तो जिवंत राहिला कारण या निवडणुकीत उमेदवार मार्टिन व्हॅन ब्यूरन यांना त्यांच्या मूळ ओल्ड किंडरहूक या गावावरुन ‘किंडरहूक’ हे टोपणनाव मिळाले. मग समर्थकांनी त्यांच्या क्लबचे नाव ‘ओके क्लब’ ठेवले आणि त्याचे घोषवाक्य बनले, ‘आम्ही ओके आहोत!’. आणि तेव्हापासून ओके या शब्दाला राजकीय लोकप्रियता मिळाली. लोक त्याचा अर्थ ओल्ड किंडरहूक असा मानू लागले. ओकेच्या अर्थ आणि उत्पत्तीबद्दल नंतर अनेक भाषा सिद्धांतही समोर आले. काही लोकांनी त्याचा संबंध चोक्टॉ जमातीच्या ओके या शब्दाशी जोडले. तथापि, भाषाशास्त्रज्ञांनी नंतर सिद्ध केले की ओके हे प्रत्यक्षात ‘ऑल करेक्ट’ चेच संक्षिप्त रूप आहे आणि त्याची मुळे वर्तमानपत्रांमधील विनोदी लेखांशी संबंधित आहेत. तेव्हा आता ओके म्हणताना ही गंमत लक्षात ठेवा.



# आदर दाखवण्याचा योग्य उपाय

**एटिकेट्स**

**आरती देशपांडे**

तुम्ही अनेक लोकांना ‘लेडीज फर्स्ट’ म्हणताना ऐकले असेल. तुमच्यातील काही मुलगेही हा नियम पाळत असतील. याचा अर्थ महिला वा मुलींना आधी जागा देणे, असा असतो. पार्ट्यांमध्ये पुरुष पुढे जातो आणि बायकांसाठी दार उघडतो. काही जण त्यांच्यासाठी खुर्ची ओढतात तर काही जण सार्वजनिक ठिकाणी रांगेत उभ्या असणाऱ्या महिलांना पुढे येण्यास सांगतात. हे एक चांगले वर्तन समजले जाते. मात्र लेडीज फर्स्ट म्हणण्याचा ट्रेंड कुठून सुरू झाला? हे अनेकांना माहिती नसते.


छोट्या मित्रांनो, ही परंपरा युरोपपासून सुरू झाली. त्यावेळी तेथील श्रीमंत लोक महिलांचा आदर केला पाहिजे, असे मानणारे होते. त्या काळात महिलांना शारीरिकदृष्ट्या नाजूक मानले जात होते. म्हणूनच, सुरुवातीपासूनच पुरुषांना महिलांसाठी दार उघडण्यास, त्यांना पुढे जाऊ देण्यास किंवा त्यांना बसण्यासाठी खुर्ची देण्यास शिकवले जात होते. या परंपरेचा अर्थ महिलांना कमकुवत समजणे नव्हता तर त्यांना आदर आणि प्रेम देणे असा होता.

पुढे १९१२ मध्ये टायटॅनिक जहाज बुडत होते, तेव्हाही ‘लेडीज अँड चिल्ड्रन फर्स्ट’ म्हणत महिला आणि मुलांना बुडत्या जहाजातून प्रथम बाहेर काढण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही घटनाही ‘लेडीज फर्स्ट’च्या विचारसरणीला बळकटी देणारी ठरली. म्हणूनच टायटॅनिक घटनेनंतर हा शिष्टाचार मोठ्या प्रमाणात स्वीकारला गेला. आजही अनेकजण आवर्जून असे वागतात. तर मग तुम्हीही हा नियम पाळणार ना?

**ठिपके जुळवा**



# असं आहे स्मार्ट दप्तर




**छोटे उस्ताद**

जगभरातल्या शास्त्रज्ञांनी विविध शोध लावले. या शोधांमुळे माणसाचं जीवन सुकर होत आहे. पण शोध लावण्यात लहानगेही मागे नाहीत बरं का! छोट्या आर्यन तंवरने स्मार्ट दप्तराचा शोध लावला आहे. तुम्हा मुलांवर दप्तराचं प्रचंड ओझं असतं. हे ओझं कमी करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करता करता त्याने स्मार्ट दप्तरच बनवून टाकलं. शाळेचं वेळापत्रक असतं. दररोजचे तास ठरलेले असतात. त्या त्या विषयाचं पुस्तक आणि वह्या शाळेत न्याव्या लागतात. दप्तर भरताना प्रत्येक वेळी वेळापत्रक बघावं लागतं. पण हे स्मार्ट दप्तर तुमचं वेळापत्रक लक्षात ठेवेल आणि प्रत्येक दिवसाचं वेळापत्रक तुम्हाला सांगेल. प्रत्येक दिवशी कोणती वह्या-पुस्तकं न्यायची, याची माहिती हे दप्तरच तुम्हाला देईल. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटीफिकेशन टॅगमुळे हे शक्य होतं. हा टॅग पुस्तकांना लावलेला असतो. दप्तरावर एलईडी लाईट बसवलेला असतो. त्यामुळे तुम्ही दुसऱ्याच विषयाचं वही-पुस्तक भरलं तर हे दप्तर तुम्हाला सूचना देतं. या पुढच्या काळात हे दप्तर तुम्हाला हवामानाचीही माहिती देईल. मुलांनी छत्री किंवा रेनकोट न्यायचा का नाही हे सुद्धा दप्तरच सांगेल.

# घडवा चांगले भवितव्य



**कोण होणार?**

आता प्रत्येक क्षेत्रात डेटाचं महत्त्व वाढलं आहे. आपला डेटा जपून ठेवावा लागतो. मात्र प्रत्येक वेळी एवढा डाटा साठवून ठेवणं शक्य होत नाही. यासाठी क्लाउड काँप्युटिंगचा पर्याय योग्य ठरतो. म्हणूनच आज कंपन्यांना क्लाउड कॉम्प्युटिंगमधल्या तज्ज्ञांची गरज आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगशी संबंधित विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले की कारकिर्दीत अनेक संधी उपलब्ध होतात. क्लाउड कॉम्प्युटिंगचे ऑनलाईन कोर्सही आहेत. ते घरबसल्या पूर्ण करता येतात. कॉलेजमध्ये असतानाही तुम्ही हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. क्लाउड कॉम्प्युटिंग सोल्यूशन्स आर्किटेक्ट, क्लाउड मॅनेजमेंट, सेल्स स्पेशलिस्ट, क्लाउड कॉर्पोरेट सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह, क्लाउड सॉल्यूशन्स एक्झिक्युटिव्हजसारखी पदं तुम्ही भुषवू शकता. त्यामुळे क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये उत्तम भवितव्य घडू शकतं हे लक्षात ठेवा.

# कार्टूनच्या करामती



**फन टाईम**

तुम्ही कार्टून बघत असाल. कार्टूनमधली प्रमुख पात्रं तुम्हाला हसवतं. काही तरी संदेश देतं. डोरेमॉन, मिकी माउस, डोनाल्ड डक, शिंचॅन अशी बरीच पात्रं मुलांना आवडतात. मात्र आपल्याला या कार्टून पात्रांविषयी बऱ्याचशा गोष्टी माहीत नसतात. चला तर, मग कार्टून्सची गुपितं जाणून घेऊ.

✻ ‘टॉम अँड जेरी’ हे कार्टून तुम्हाला माहीत आहे. टॉम आणि जेरी म्हणजे मांजर आणि उंदिर. ते एकमेकांचे शत्रू. त्यांच्या या भांडणात कधी टॉमची सरशी होते तर कधी जेरी जिंकतो. छोटासा जेरी टॉमला जेरीस आणतो. पण सुरूवातीला ही पात्रं जेस्पर आणि जिंक्स या नावाने ओळखली जायची. त्यानंतर त्यांची नावं बदलण्यात आली.

✻ मिकी माउस सगळ्यांचा आवडता. हा सुद्धा उंदिरच. हा मिकी माउस मध्यंतरी ८० वर्षांचा झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गुप्तहेर ‘मिकी माउस’ या शब्दाचा वापर करत. गुप्त शब्द म्हणून मिकी माउसचा वापर व्हायचा. आता हाच मिकी माउस मुलांचा आवडता बनला आहे.

✻ ‘टिनेज म्युटेड निंजा टर्टल’ हे कार्टून तुम्ही बघितलं असेल. यातले टर्टल्स वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड्स बांधतात. पण सुरवातीला सगळ्यांचे हेडबँड्स लाल रंगाचे होते. प्रत्येकाची वेगळी ओळख पटावी म्हणून निर्मात्यांनी त्यांना वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड दिले.

# निसर्गाचे रहस्य




**गप्पांगण**

**वीणा देशमुख**

मुलांनो, केळी हे एक सुपरफूड असल्याचे तुम्ही जाणत असाल. त्यामुळे केळी खाल्याने आपल्याला त्वरित ऊर्जा मिळते शिवाय अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करण्यास देखील याची मदत होते. बरेच लोक नाश्त्यापासून संध्याकाळची थोडीशी भूक भागवण्यापर्यंत आहारात केळाचा समावेश करतात. याशिवाय स्नायूंच्या बळकटीप्रमाणेच शरीरात इलेक्ट्रोलाइट्चे संतुलन राखण्यासाठीही केळी वरदान ठरतात. एकंदरीत हे फक्त एक फळ नाही तर गुणधर्मांचा खजिना आहे. पण केळी थोडीशी वाकलेली का असतात, याचा तुम्ही कधी लक्षात घेतले आहे का? मुलांनो, त्यामागे निसर्गाचे एक रहस्य लपलेले आहे. म्हणूनच सरळ-चपटी केळी क्वचितच दिसतात. केळीच्या वाकड्यापणाचे सर्वात मोठे कारण म्हणजे ‘फोटोट्रॉपिझम’ म्हणजेच वनस्पतींचा सूर्याकडे झुकणे हे आहे. केळीचे झाड फळे देण्यास सुरुवात करते तेव्हा कळ्या खाली वाकलेल्या असतात. म्हणजेच फळाची सुरुवातीची वाढ गुरुत्वाकर्षणाच्या दिशेने होते. फळ वाढू लागताच केळीमधल्या पेशी सूर्यप्रकाशाकडे वाकू लागतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया असते ज्यामध्ये फळ हळूहळू वरच्या दिशेने वाढू लागते. अशा परिस्थितीत सूर्याकडे झुकल्यामुळे केळी सरळ होण्याऐवजी वरच्या दिशेने वाकलेली आणि वाकडी दिसतात.

# असं आहे खवय्यांचं शहर



**नॉलेज**

मुलांनो, आपला देश विविधतेने नटला आहे. इथल्या प्रत्येक प्रांताचं एक वेगळेपण आहे. आपल्या देशातलं प्रत्येक शहरही वेगळं आहे. तिथले खाद्यपदार्थ, पर्यटनस्थळं यात विविधता आढळते. चला तर, मग सिटी ऑफ जॉय म्हणजेच कोलकाताची माहिती घेऊ.

✻ १९११ पर्यंत कलकत्ता म्हणजे आजचं कोलकाता ही भारताची राजधानी होती. व्यापाराच्या दृष्टीने या शहराचं बरंच महत्त्व असल्यामुळे ब्रिटिशांनी कोलकात्याला राजधानीचा दर्जा दिला होता. त्यानंतर दिल्ली भारताची राजधानी बनली.

✻ कोलकात्यातल्या लोकांना फूटबॉल प्रचंड आवडतं. मात्र क्रिकेटवरही त्यांचं प्रेम आहे. ईडन गार्डन्स हे जगातलं तिसरं सर्वात मोठं क्रिकेट मैदान कोलकात्यात आहे.

✻ दक्षिणेश्वर काली मंदिर, व्हिक्टोरिया मेमोरियल, मार्बल पॅलेस, फोर्ट विलियम आणि हावडा ब्रिज ही कोलकात्यातली महत्त्वाची पर्यटनस्थळं आहेत.

✻ कोलकाता हे खवय्यांचं शहर आहे. इथे चविष्ट बंगाली मिठाया मिळतात. तसंच माछेर झोल, मिष्ठी दही, गोलगप्पा इथे आवडीने खाल्ले जातात. त्यामुळे कोलकात्याला गेल्यावर हे पदार्थ चाखायलाच हवेत.

✻ कोलकात्यात पुस्तक महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवाला लोक मोठ्या संख्येने येतात. असं हे कोलकाता पश्चिम बंगालची राजधानी आहे. देशातल्या चार महानगरांमध्ये कोलकाताची गणना होते.




**दोस्त हे मस्त**

## अँजल शार्क



अँजल शार्क नावाचा एक प्राणी आहे. काळा समुद्र, भूमध्य समुद्र आणि नॉर्दन अटलांटिक समुद्र या भागात हा शार्क आढळतो. अँजल शार्कची मोठ्या प्रमाणावर शिकार होत आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी होत चालली आहे. भूमध्य समुद्र तसंच इतर भागात खूप कमी शार्क दिसतात. सध्या शार्कची ही प्रजाती वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**खादाडी**

## चविष्ट बिस्किट केक



दोस्तांनो, तुम्ही बिस्किटांचा केक बनवू शकता. यासाठी हाईड अँड सिक बिस्किटांचा एक पुडा घ्या. पारले जीचाही पुडा घ्या. दोन चमचे साखर, अर्धा चमचा बेकिंग पावडर, एक कप दूध, व्हॅनिला इसेन्स आणि चमचाभर बटर हे साहित्य घ्या. आता दोन्ही बिस्किटं मिक्सरमध्ये वाटून घ्या. बारीक पूड करा. ही पूड एका बाऊलमध्ये काढून घ्या. त्यात दूध आणि साखर घालून नीट मिक्स करा. यात बेकिंग पावडर आणि व्हॅनिला इसेन्स घाला. आता केकचा ट्रे घ्या. त्यावर बटर लावा. त्यावर हे मिश्रण ओता. आता हा ट्रे मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. पाच मिनिटांनी काढा. तुमचा बिस्किट केक तयार आहे.

**स्टडी टिप्स**

## लागा अभ्यासाला



छोट्यांनो, हळूहळू परीक्षेचे वेध लागतील. आता तुमचा अभ्यास वाढू लागला असेल. त्यामुळे अभ्यासाचा जोर लावायला हवा. आता अभ्यासाचं नियोजन करून कामाला लागा. सकाळी लवकर उठून अभ्यास करा. यासाठी मोबाईलवर अलार्म लावा. अलार्म वाजल्यावर उठा. जवळ कॅलेंडर ठेवा. महत्त्वाच्या दिवसांची नोंद करून ठेवा. कोणत्या विषयाचा अभ्यास किती वेळात होईल हे बघा. त्यानुसार नियोजन करा.

**योगा टाईम**

## एकाग्रता वाढवणारं बालासन



मुलांनो, आपली एकाग्रता वाढवायला हवी. योगासनांमुळे तुम्ही लक्ष केंद्रित करू शकता. बालासन हा प्रकार खूपच उपयुक्त आहे. बालासन म्हणजे लहान मुलांप्रमाणे डोकं जमिनीवर टेकवणं. या आसनामुळे एकाग्रता वाढते. भरपूर अभ्यास करण्यासाठी तुमची बुद्धी तल्लख व्हायला हवी. बालासनामुळे हे शक्य होतं.

# कलासक्त

**नाट्यचित्रपट अभिनेते प्रदीप कबरे यांच्या कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असतानाच सध्या त्यांनी त्यांच्या 'खिडकी' या कार्यक्रमाच्या अभिवाचनाचाही सुवर्णमहोत्सवी प्रयोग बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात २ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होत आहे. 'खिडकी' हे त्यांनीच लिहिलेले त्यांच्या अनुभवावर व संवेदनशील अवलोकनांवर आधारीत पुस्तक आहे. एक नाट्यचित्रपट अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यलेखक व निर्माता असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या प्रदीप कबरे यांच्या कारकिर्दीबद्दल खूप काही लिहिण्यासारखे आहे. कलाक्षेत्रातील त्यांच्या अष्टपैलू मुशाफिरीचा आढावा घेण्याचा प्रयत्न करीत आहे.**

# प्रदीप कबरे यांचा अभिनय कारकिर्दीचा सुवर्ण महोत्सव










रंगबहार

**शरद कोरडे**


प्रदीप कबरे यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९५६ रोजी झाला. सिंधुदूर्गातील वेंगुर्ले तालुक्यातील शिरोडा हे त्यांचे मूळ गाव. एका मध्यमवर्गीय सुशिक्षित व सुसंस्कृत समाजात त्यांचा जन्म झाला. वडील राधाकृष्ण कबरे हे मुंबईत पश्चिम रेल्वेमध्ये ऑफिसर म्हणून नोकरीला होते. प्रदीपला मराठी शाळेत असल्यापासून नाटकाची आवड निर्माण झाली. पाचवीत असताना त्याने शाळेच्या व पालकांच्या एकत्रित संमेलनातील नाटकात प्रथम काम केले. त्यानंतर १९७२ साली बाबूराव गोखले चित्रित 'करायला गेले एक' या स्पर्धेतील नाटकात हरिभाऊ हर्षेची विनोदी भूमिका केली. त्यानंतर मुंबईत होणाऱ्या विविध नाट्यसंस्थांच्या एकांकिका स्पर्धेत सातत्याने सहभाग घेतला. यावेळी त्यांना रमेश पवार यांच्यासारखा नाट्यगुरू मिळाला. रमेश पवार यांच्या दिग्दर्शनाखाली त्यांनी लिहिलेल्या 'म्हाँ... शेवटचा बळी', 'बेब्स इन वूड', 'ग्रेटेस्ट सावरीन' आदी एकांकिकांमधून कामे केली. 'गुलमोहोर', 'अंगाई', 'कोण हसल आपल्यांना', 'वेटींग फार घासलेट', 'हाय मेरा दिल' व 'वेटींग फार घोस्ट' या एकांकिकांतून कामे करून अभिनयाची पारितोषिके मिळविली.

इंडियन नॅशनल थिएटर मार्फत अशोक रहाणे लिखित 'कोंडी' हे राजकीय पार्श्वभूमीवरील शोषणावर आधारीत नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आले. त्यात सतीश दुभाषी, रवि पटवर्धन, रजनी जोशी, बानू शेख व प्रदीप कबरे यांनी भूमिका केल्या होत्या. या नाटकाचा प्रथम प्रयोग १४ जुलै १९७४ मध्ये मुंबईत शिवाजी मंदिर येथे झाला. हेच प्रदीप कबरे यांचे व्यावसायिक रंगभूमीवरील पहिले नाटक. त्यानंतर हे नाटक थोर दिग्दर्शक शंभू मित्रा यांनी दिग्दर्शित केले होते. मुंबईतील गाजलेल्या रामन राघव खून खटल्यावरील रमेश पवार लिखित 'वरचा कानून' या नाटकात प्रदीप कबरे यांनी विनोदी हवालदाराची भूमिका केली. या नाटकात अशोक सराफ यांनी रामन राघवची खलनायकी मनोरूग्णाची अवघड भूमिका केली होती. पण त्यावेळी अशोक सराफ हा विनोदी नट म्हणून प्रसिद्धीस आला होता. त्याला वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांनी स्विकारला नाही व पन्नास प्रयोगानंतर हे नाटक बंद पडले. प्रदीप कबरे यांनी त्यानंतर कमलाकर सारंग यांच्या दिग्दर्शनाखाली 'खोल खोल पाणी', 'जोडीदार', व 'सखाराम बाइंडर' या नाटकांतून कामे केली. उदय घुरत यांच्या माऊली प्रॉडक्शनच्या 'कार्टी प्रेमात पडली', 'देखणी बायको दुसऱ्याची', 'येता का खंडाळ्याला', 'लहानपण देगा देवा' या नाटकांतून प्रदीपने महत्वाच्या भूमिका केल्या. त्यानंतर प्रदीपने १६ नोव्हेंबर १९८७ मध्ये आपली स्वतःची गुरू प्रॉडक्शन ही नाट्यसंस्था स्थापन केली. आपल्या मनाजोगी नाटके व आवडत्या भूमिका करता याव्यात हा त्यामागील दृष्टीकोन होता व त्यासाठी प्रदीपने आपली ॲडव्हार्टाईज कंपनीतली चांगरी नोकरी सोडून पूर्णतः कलाक्षेत्राला स्वतःला वाहून घेतले. सुधीर खर्डा लिखित 'बोल बाबी बोल' हे नाटक कमलाकर सारंग यांच्या दिग्दर्शनाखाली रंगभूमीवर आणले. एका दुराग्रही व शिघ्रकोपी वडिलांच्या छायेखाली निष्पाप व निरागस मुलाचे आयुष्य कसे कोमेजून जाते याचा दाहक अनुभव देणाऱ्या या नाटकात कमलाकर सारंग यांनी वडिलांची तर प्रदीपने त्यांच्या मुलाची भूमिका केली होती. हे पहिलेच नाटक यशस्वी झाल्यावर प्रदीपने स्वतःच लिहिलेले 'माझी लाडकी' हे नाटक स्वतः दिग्दर्शिक करून प्रदर्शित केले. या नाटकात विजय चव्हाण, शमा राज व मुग्धा शहा यांच्यासह प्रदीप कबरे यांनी काम केले होते. त्यानंतर भालचंद्र निखारजे लिखित 'धांदलीत धांदल' हे विनोदी नाटक प्रदीपने स्वतः दिग्दर्शित करून रंगभूमीवर आणले. या नाटकात विजय चव्हाण, राजा मयेकर, विजय पाटकर, शेखर विश्वासराव, सुषमा तेंडूलकर व प्रदीप कबरे यांनी भूमिका केल्या होत्या. हे धमाल नाटकही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले.

गोव्याचे नाटककार वसंत कामत यांनी लिहिलेले 'हँडस अप' हे विनोदाच्या अंगाने जाणारे रहस्यमय नाटक सदाशिव अमरापूरकर यांनी दिग्दर्शित केले होते व भक्ती बर्वे यांनी आपल्या अजरामर अभिनय शैलीने गाजवले होते ते नाटक त्यानंतर प्रदीप कबरे यांचेकडे आले. त्यांनी अविनाश नारकर व ऐश्वर्या नारकर यांना घेऊन नवीन संचात हे नाटक पुनर्प्रदर्शित केले व सुमारे १७५ प्रयोग या नाटकाचे झाले. त्यानंतर राजू फुलकर यांचं 'कुणास्तव कुणीतरी' संभाजी सावंत यांचे 'शिकस्त' व 'चाफा बोले हा!' ही नाटके केली. त्याबरोबरच योगेश सोमण यांच्या '१ एप्रिल' या एकांकिकेचे २ अंकी नाटकाची रंगप्रवृत्ती प्रदीप यांनी लिहून त्याचे 'एप्रिल फूल बनाया' हे प्रायोगिक नाटक रंगभूमीवर आणून त्याचे अनेक प्रयोग केले. 'दिल धक धक करे' या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन, अभिनय व निर्मितीही प्रदीप कबरे यांनी केली. प्रदीप कबरे यांनी ३० व्यावसायिक नाटकांतून कामे करून ४५०० पेक्षा अधिक प्रयोगातून कामे केली. शिवाय नाट्यप्रेमी तरूण-तरूणींना नाटकाच्या तंत्रासहीत अभिनयाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी 'आरती आर्टस अकादमी' ही नाट्यसंस्था सुरू करून अनेकांना नाट्य प्रशिक्षण दिले व अनेक एकांकिका स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी नवोदित कलाकारांना मिळवून दिली. डॉ. गिरीश दाबके लिखित 'गेले लिहायचे राहून' व संभाजी सावंत लिखीत 'शिकस्त' या हिंदी व मराठी नाटकांतून तसेच 'एप्रिल फूल बनाया' मधून अनेक नवोदित व होतकरू तरूणांना नाट्यस्पर्धेत व व्यावसायिक नाटकात भूमिका करण्याची संधी प्रदीप कबरे यांनी दिली.नाटकांतून भूमिका करीत असतानाच प्रदीप कबरे यांनी अनेक मराठी चित्रपटांतून कामे केली. महेश कोठारे यांच्या 'पछाडलेला' व 'झपाटलेला' व 'धांगडधिंगा', पितांबर काळे यांचा 'हिरवा चुडा' गायकवाड यांचा 'सख्खा सावत्र', सचिनचा 'नवरा माझा नवसाचा' आदी चित्रपटात काम करीत असतानाच 'कसं हो व्हायचं याचं' या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात अनिकेत विश्वासराव, रमेश भाटकर, स्मिता जयकर, रेश्मा मर्चंट, प्रदीप कबरे, दिपक शिर्के यांच्या भूमिका होत्या. त्यानंतर निर्माती सुनंदा पवार यांच्या 'इचार ठरका पक्का' या चित्रपटाची कथा व पटकथा लिहून त्यातील मध्यवर्ती भूमिकाही प्रदीप यांनी केली. या चित्रपटात भरत जाधव, प्राची शहा, विजय चव्हाण, सुषमा भालेकर यांच्या भूमिका होत्या. या चित्रपटाचे दिग्दर्शन मनोहर सरवणकर यांनी केले होते व संगीत बाळ नाईक यांचे होते. त्यानंतर राजू पार्सेकर दिग्दर्शित 'पोलीस लाईन' या मनोहर सरवणकर दिग्दर्शित चित्रपटातील प्रदीप कबरे यांनी फोनवरून धमकी देणाऱ्या दाऊदची भूमिका केली होती.मुंबई दूरदर्शनच्या अनेक मालिकांतून सातत्याने काम करताना 'गप्पागोष्टी' या मानसिंग पवार यांच्या कृषीविषयक कार्यक्रमात मालवणी बाबल्या सुमारे १०० इपिसोडमध्ये केला. 'जोडी तुझी माझी' या बाळ पाटणकर निर्मिती मालिकेत विक्रम गोखले, शेखर विश्वासराव, सुलभा देशपांडे यांच्यासह प्रदीप कबरे यांनी नाटकाचे काम केले. या मालिकेत काम करीत असतानाच प्रदीप कबरे यांनी स्वतः निर्मिती केलेल्या 'सातासमुद्रापार' व 'सावळ्याच्या संगे' या मालिका दूरदर्शनवर प्रदर्शित झाल्या. 'शोधू कुठे किनारा' या लक्ष्मीकांत कर्वे दिग्दर्शित मालिकेत भक्ती बर्वेसह प्रदीपने काम केले. तसेच हिंदी 'घाशीराम कोतवाल' या नाटकातही प्रमुख भूमिका केली. त्याने आतापर्यंत ४० च्या वर मराठी व हिंदी मालिकांतून काम केले आहे. आपल्या या यशाचे सारे श्रेय प्रदीप दिग्दर्शक व लेखक रमेश पवार व कमलाकर सारंग यांना देतो. त्यांचे ऋण मी विसरू शकत नाही असे तो आवर्जून सांगतो. विजय चव्हाण व अभिनेत्री पद्मा चव्हाण यांच्यासह काम करताना खूप आनंद मिळाला तर किशोर प्रधान, शोभा प्रधान यांच्यासारख्या सच्च्या व सज्जन माणसांचा सहवास व मार्गदर्शन मिळाल्याबद्दल तो स्वतःला भाग्यवान समजतो. 'मी कोणाबद्दलही कटुता अथवा वैरभाव मनात ठेवलेला नाही. दुःख ही अनुभवाची शिदोरी आहे. असे मानून मी वर्तमानात जगतो व भविष्याचा वेध घेतो व उद्याची स्वप्ने मी आजही पाहतो' हे माझ्या जीवनाचे सार आहे. मोकळेपणाने व संवेदनशीलतेने प्रदीप सांगतो. त्याच्या भविष्यातील उत्तमोत्तम प्रकल्पासाठी शुभेच्छा देऊन त्याच्या सुवर्णमहोत्सवी अभिनय कारकिर्दीबद्दल त्याचे अभिनंदन करूया! ●●

# एकमेवाद्वितीय सुपरस्टार राजेश खन्ना

**श्रीराम शेटये**



भारतीय चित्रपट विश्वात ज्याने आपले स्टारडम सर्वोच्च शिखरावर झळकवले तो सुपरस्टार राजेश खन्ना म्हणजे विधात्याने निर्माण केलेली एक अद्भूत विभूती होती. जतीन खन्ना हे मुळ नाव असलेला हा मुलगा. दिसायला एवढा देखणा की मेकपची गरज नाही. निसर्गाइतकाच इतका सूंदर तेजकांती मुलायम त्वचा, तेजस्वी चेहरा. स्टारडम पुरेपूर भरलेले होते. आपल्या अनोख्या अंदाजाने लाखो सिनेरसिकांच्या ह्रदयाची धडकन असलेला राजेश खन्ना यांना भारतीय चित्रपटसृष्टी एक अद्वितीय सुपरस्टार म्हणूनच ओळखते.

१८ जुलैला लाखो चाहत्यांना रडवत राजेश खन्नांनी जगाचा निरोप घेतला. हिंदी सिनेमाचा पहिला सुपरस्टार राजेश खन्ना १९६९ साली आराधना हा सिनेमा रिलीज झाला. आणि हिंदी सिनेमाला सुपरस्टार मिळाला. त्यानंतर सलग १५ सिनेमे हिट्स दिले. हिंदी सिनेमाच्या क्षेत्रात त्याआधी कुणाच्याही वाट्याला न आलेलं स्टारडम, ग्लॅमर, लोकप्रियता, यश या सगळ्याचा धनी असलेला हा माणूस तहयात आयुष्य स्वत:च्या अटींवर जगला. राजेश खन्ना यांचा काळ संपला, त्यानंतरच्या काळात सिनेमे कमालीचे बदलले, तरीही कुणी तरी आपल्यावर कायम गारुड केलं होतं, हेच दाखवते.

२९ डिसेंबर १९४२ साली अमृतसर इथं जन्मलेले जतीन खन्ना, भारतीय फिल्म इंडस्ट्रीमध्ये राजेश खन्ना या नावानं ओळखले जाऊ लागले. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी आखरी खत या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.

त्याचे काका चुनीलाल खन्ना रेल्वेमध्ये मोठे कॉन्ट्रक्टर होते. त्यांनीच बालपणापासून जतीनचा सांभाळ केला होता व जतीनचे 'राजेश' म्हणून नामकरण केले होते. राजेश खन्ना हा मूळचा स्टेज आर्टस्टि होता. अभिनयाची त्याची स्वतची शैली होती. दिसायलाही तो देखणा होता. १९६५ साली युनायटेड प्रोड्यूसर्सच्या 'टॅलेण्ट हंट' स्पर्धेत तो सर्व प्रथम आला होता.

त्याच्या 'आखरी खत' (१९६६) या पहिल्या चित्रपटाकडे सिनेदर्शकांनी पाठ फिरवली परंतु हाच चित्रपट बेस्ट फॉरेन मुव्ही म्हणून ऑस्कर पुरस्कारासाठी भारतातर्फे पाठविण्यात आला होता. त्याचा 'बहारों के सपने' चित्रपट बऱ्यापैकी चालला. पण त्याचे सारे श्रेय नायिका आशा पारेख घेऊन गेली होती. राजेश या दुनियेत नवखा होता. आशा पारेखचे इंडस्ट्रीत बऱ्यापकी नाव होते. इथे कुठेतरी त्याचा स्वाभिमान दुखावला गेला. त्याक्षणी राजेशने ठरवले की यापुढील चित्रपट माझ्या स्वत:च्या नावावर चालतील. त्यादृष्टीने त्याने जोरदार प्रयत्न चालू केले.

बी. आर. चोप्रांचा 'इत्तेफाक' (१९६९) हा लो बजेट गीतविरहित नाट्यपूर्ण रहस्यमय चित्रपट होता. चोप्रांनी तो केवळ २८ दिवसांत पूर्ण केला होता. राजेश खन्ना 'इत्तेफाक' व राज खोसलांचा 'दो रास्ते' या दोन्ही चित्रपटांत एकाच वेळी काम करीत होता. 'इत्तेफाक'मध्ये दिलीप रॉय या वेड्याच्या भूमिकेसाठी त्याला दाढी ठेवावी लागली म्हणून 'दो रास्ते'मध्येही त्याने दाढी ठेवूनच भूमिका केली. १९६८-६९ या उमेदीच्या काळात भूमिका मिळविण्यासाठी चाचपडत फिरणाऱ्या राजेश खन्नाला सुपरस्टार पदापर्यंत घेऊन जाण्यास सर्वात जास्त मदत देवयानी चौबळ या ज्येष्ठ सिनेपत्रकार स्त्रीने केली. तिचा 'बिलिव्ह इट ऑर नॉट' हा कॉलम वाचकात प्रचंड लोकप्रिय होता. ती स्वत राजेश खन्नाला बरोबर घेऊन निर्मात्यांना भेटायला जात असे. राजेश खन्ना डिपल कपाडियाशी विवाह करणार आहे, ही गुप्त बातमी केवळ देवयानीलाच माहीत होती. पुढे त्यांच्यात काय बिनसले ते कळले नाही. पण हीच देवयानी राजेश खन्नाचं खासगी आयुष्य वेशीवर टांगू लागली.

**असाही आशीर्वाद**

देवेंद्र गोयलच्या 'वचन' (१९५५) द्वारे राजेंद्र कुमारने रूपेरी पडद्यावर पदार्पण केले. त्यांच्या या पहिल्याच चित्रपटाने अनेक सिनेमागृहात सिल्व्हर ज्युबिली साजरी केली. त्याच्या मागोमाग व्ही. शांताराम यांचा 'तुफान और दीया' चोप्रांचे 'धूल का फूल' व 'कानून' मेहबूब खान यांचा 'मदर इंडिया' प्रदर्शित झाले. हे सर्वच चित्रपट हिट झाले. राजेंद्रकुमार वांद्र्याच्या कार्टर रोडला डिंपल बंगल्यात भाडेकरू म्हणून राहत होते. नंतर ते पाली हिलवर स्वत:च्या बंगल्यात राहायला गेले. 'आराधना' चित्रपटाने अपूर्व यश मिळविल्यावर राजेश खन्नाने हा डिंपल बंगला विकत घेऊन त्याचे नामकरण 'आशीर्वाद' केले. या जागेचा नक्कीच काहीतरी पायगुण असावा. केवळ दहा वर्षांच्या कारकीर्दीत राजेंद्रकुमारचे जवळजवळ पंचवीस चित्रपट हिट झाले.

१९६९ मध्ये शक्ती सामंतांचा 'आराधना' प्रदर्शित झाला. दार्जिलिंगचे नयनमनोहर निसर्गसौंदर्य रानावनातून नागमोडी वळणे घेत सरपटत जाणारी मिनी ट्रेन राजेश खन्ना, शर्मिला टागोरची उत्तेजक प्रणयदृश्ये आणि तरुणाईला साद घालणारे जोशीले संगीत! 'आराधना'चे संगीतकार सचिनदेव बर्मन असले तरी ती सांगीतिक करामत फक्त दोन गुणी वादक कलाकारांची होती. केरसी लॉर्ड आणि मनोहरी सिंग! 'आराधना' मधील 'रूप तेरा मस्ताना' आणि 'मेरे सपनो की रानी' या गाण्यातील त्यांची ॲकॉर्डियन आणि सॅक्सोफोनची अप्रतिम जुगलबंदी कधीही विसरता येणार नाही. याच चित्रपटात किशोरकुमारने कात टाकून एक नवीन रोमॅण्टिक रूप धारण केले. 'आराधना'मुळे राजेश खन्ना व किशोरकुमार दोघांचे ही नशीब फळफळले. 'आराधना' जबरदस्त हीट झाला. गुलशन नंदाच्या 'कटी पतंग' कादंबरीवर आधारित, शक्ती सामंतानी 'कटी पतंग' चित्रपटाची निर्मिती केली. कथा नायिका प्रधान असली तरी तो राजेश खन्नाचा चित्रपट म्हणूनच ओळखला गेला. 'खामोशी' (१९६८) मध्ये राजेश खन्नाच्या अभिनयाचा एक वेगळा पलू पाहायला मिळतो. तो (राजेश खन्ना) वेडा असतो आणि ती नर्स (वहिदा रहेमान) त्या वेड्याला बरे करण्याच्या प्रयत्नात स्वत वेडी होते. ती वेडी झाली म्हणून हा तिला सोडून जात नाही. तिच्यासाठी तो थांबतो. तिचा स्वीकार करतो. प्रेक्षकांना राजेश खन्नाची ही सकारात्मक भूमिकाही आवडली. त्यातील 'वो शाम कुछ अजीब थी' गाण्यात किशोर कुमारनी अक्षरशः जीव ओतला आहे आणि राजेश खन्नानी आपल्या सर्वांगसुंदर अभिनयाने तो प्रसंग जिवंत केला आहे. मनमोहन देसाईच्या 'सच्चा झूठा' चित्रपटात 'दिल सच्चा और चेहरा झूठा' गाण्यात मानेला आणि हाताला असा काही हळूवार झटका देतो की त्याच्याकडे पाहात बसावे. 'मेरी प्यारी बहनीया' गाणे पाहताना, आपल्यालाही असा एक प्रेमळ भाऊ असावा अशी स्त्रियांच्या मनात उर्मी दाटून येत असे. 'सफर' हा त्याचा एक उल्लेखनीय चित्रपट होता. 'सफर'मध्ये तो सहजगत्या तत्त्वज्ञान सांगून जातो. हृषिकेश मुखर्जीचा 'आनंद' म्हणजे राजेश खन्नाच्या अभिनय कलेचा परमोच्च बिंदू होता. त्याचे केविलवाणे खिन्न हास्य 'देवदास'मधील सहगलची आठवण करून देते. 'आनंद' मधील त्यांचा अमेझिंग परफॉर्मन्स पाहताना 'दर्द का बादशहा' दिलीप कुमारचाही विसर पडतो. 'आनंद'मध्ये नायिका नव्हती. सगळा फोकस फक्त राजेश खन्नावर होता. स्वतः हसता हसता दुसऱ्याला रडविणे ही अभिनयकला राजेश खन्नाला चांगली अवगत होती. कॅमेऱ्याकडे बघून क्लोजअप घेऊन रडणारे कलाकार आपल्याकडे फारच कमी आहेत. प्रेमाने आणि प्रेमाखातर रडणारा फक्त एकच कलाकार मी पाहिला आणि तो म्हणजे राजेश खन्ना! त्यातील अमिताभ बच्चन, जॉनी वॉकर, ललिता पवार, रमेश देव, सीमा यांच्या भूमिकाही दृष्ट लागण्यासारख्या झाल्या आहेत.

लोकांचे त्यांच्यावर उदंड प्रेम असते. सिनेमा पाहताना आनंद (राजेश खन्ना) मरणार ही कल्पनाही प्रेक्षकांना सहन होत नाही. कमर्शियल सिनेमाच्या जमान्यात अशी शोकांतिका फक्त राजेश खन्ना आणि डायरेक्टर हृषिकेश मुखर्जीच यशस्वीपणे दाखवू शकतात. सिनेप्रेक्षक वेगवेगळ्या कारणांसाठी चित्रपट पाहायला येतात. पण सहगलचा देवदास, माहेरची साडी आणि आनंद असे मोजकेच चित्रपट आहेत, की जे पडद्यावर पाहत, रडण्यासाठी रोज हजारो प्रेक्षक येत.

'अमरप्रेम'मधील त्याची बंगाली बाबूची भूमिका पाहताना अस्सल बंगालीसुद्धा लाजले असतील! त्यातील 'कुछ तो लोग कहेंगे' गाण्यातील प्रसंग पाहताना नकळत रामायणातील रामाने सीतेचा त्याग केल्याचा प्रसंग आठवतो. 'रैना बीती जाए' गाण्याचा आलाप सुरू होतो. दारूच्या नशेत बेहोश होऊन टांग्यांतून तो तिथून जात असतो. ते करूण आलाप कानावर पडताच टांग्यातून उतरून, लडखडत त्या आवाजाच्या शोधार्थ जाऊ लागतो. असा क्लासिक शॉट चित्रपटात क्वचितच पाहायला मिळतो. 'ये आंसू बाहर कैसे आ गये' हा संवाद त्याच्याच तोंडी शोभतो. पुष्पाला (शर्मिला टागोर) समजावताना तो म्हणतो 'लो फिर तुम्हारे आंखों में पानी, मने तुमसे कितनी बार कहा है की पुष्पा मुझसे ये आंसू नहीं देखे जाते, आय हेट टिअर्स!' त्याचे हे असे भावप्रधान संवाद पिक्चर संपला तरी आपला पिच्छा सोडत नाहीत. डायलॉग (संवाद) राजेशसाठी कधीच नव्हते, त्याच्या मुखातून बाहेर पडलेली प्रत्येक लाईन डायलॉगमध्ये बदलत असे. 'बावर्ची'मध्ये साधा आचारी सहजगत्या जीवनाचे तत्त्वज्ञान सांगून जातो. 'खूश रहना एक सीधीसाधी बात है, लेकिन सीधासाधा रहना बहुत मुश्किल है' त्याचा 'धनवान' चित्रपट प्रदशत झाला तेव्हा एका वृत्तपत्रात जाहिरात होती, 'नो प्रॉब्लेम. धनवान इज इन टाऊन!' 'रेड रोज' मध्ये प्रेमाचा अतिरेक होतो. त्याला जेव्हा दगा देण्यात येतो तेव्हा त्याचा तो कुठे तरी खुन्नस काढतो. 'रोटी' (१९७४) मध्ये 'जिसने गुनाह नहीं किया हो वो हमे पत्थर मार सकते है' म्हणत येशूची आठवण करून देतो. त्याने प्रत्येक चित्रपटात काहीतरी वैशिष्ट्य जपले.

**वाढता स्टारडम**

सुरांचा जादूगार कुंदनलाल सगल हा त्या काळातला दुसरा नावाजलेला स्टार! इंडियन डग्लस विठ्ठलनी सुरू केलेली हजाराची भाषा अशोककुमारने लाखाच्या घरात नेली. त्यानंतर 'दर्द का बादशहा' दिलीपकुमार, 'सपनों का सौदागर' राज कपूर, चॉकलेट हिरो देव आनंद यांच्या काळात ती वाढत वाढत पंधरा-वीस लाखांच्या घरात पोहोचली. दोन दशके या अभिनेत्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. यशाची धुंदी त्यांनाही बाधली व नंतर त्यांचीही उतरती कळा सुरू झाली.

त्याचे 'अंदाज,' 'आन मिलो सजना', 'हाथी मेरे साथी', दुश्मन', 'मेरे जीवनसाथी', दाग', 'नमकहराम', 'आप की कसम' आदी चित्रपट एका मागून एक हीट होत गेले. म्हणता म्हणता राजेश खन्ना यशाच्या अत्युच्च शिखरावर पोचला. त्याची लोकप्रियता कल्पनातीत होती. राजेश खन्नाच्या प्रतिमेवर फिदा झालेल्या तरुणी त्याच्या आशीर्वाद बंगल्याच्या बाहेर उन्हातान्हात उभ्या राहून त्याच्या नुसत्या दर्शनासाठी जीव टाकायच्या. अनेकींनी त्यांच्या फोटोशीच लग्न लावले. काहींनी स्वतच्या रक्ताने त्याला पत्र लिहिली. चॉकलेट हिरो देव आनंदची जागा त्याने घेतली होती. एकेकाळी राजेश खन्ना म्हणजे डर्बी रेसचा फेव्हरीट घोडा होता. ज्या कुणी त्याच्या चित्रपटात पसे गुंतविले त्या सर्वांना त्याने दामदुपटीने पैसे वसूल करून दिले. राजेश खन्ना आता सुपरस्टार पदाला पोचला होता. फिल्मी उद्योगात सर्वाधिक बिदागी घेणारा कलाकार झाला होता. राजेश खन्ना वन मॅन आर्मी होता. आनंद म्हणजे फक्त शोकांतिका होती. त्यात नायिकाही नव्हती. तरीही तो जबरदस्त हीट झाला. अमिताभ ॲग्री यंग मॅन म्हणून ओळखला जायचा तर काकाने मृत्यूचे उदात्तीकरण केले, वेश्येवर सात्त्विक प्रेम कसे करावे ते शिकवले. प्रेयसीला समजून घेणारा, हळूवारपणे तिच्या भावना जपणारा तो नायक होता. काकाने विविध प्रकारचे रोल केले. 'धनवान' मध्ये त्याने श्रीमंतीची मिजासही दाखवली. इतर नायक सूटबुटात वावरले, तेव्हा काका साध्या गुरू कुडत्यावर चित्रपट घेऊन गेला. सामान्यांना तो आपला नायक वाटला. श्रीमंतीही त्याने अत्यंत साधेपणाने झळकवली. त्यांच्या अंगावरची रेशमी शाल जमिनीवर ओसंडत जायची. त्याला दागदागिने, भरजरी कपडेलत्ते कशाचीच गरज नव्हती. सशक्त अभिनय हाच त्याचा खरा दागिना होता. राजेश खन्नामुळे गुरू शर्ट इतका लोकप्रिय झाला की लोक पंचतारांकित हॉटेलातही गुरू शर्ट घालून जाऊ लागले. त्या काळात बहुतेक नटांचा भांग एका बाजूला असे. याने मधून भांग पाडायची प्रथा सुरू केली आणि ती कित्येक वर्षे सुरुच होती. पण म्हणतात ना! सुंभ जळले तरी त्याचा पीळ जळत नाही. आपले दिवस पुन्हा येणार या वेड्या आशेवर स्वप्नांच्या दुनियेत तो जगत होता. अधेमधे कार्टर रोडला, मेहबूब स्टुडिओच्या परिसरात तो दिसत होता. चेहरा ओढलेला, तणावग्रस्त! पण त्या चिमुकल्या डोळ्यांत एक वेगळी चमक, एक वेगळी आशा बाकी होती. अजूनही मी संपलेलो नाही, माझा जमाना परत येणार आहे. पण अचानक १८ जुलै २०१२ ला काका गेला. दिवसभर टीव्ही चालू होता. काकाची अंत्ययात्रा जात होती तेव्हा अनेकांना आपले अश्रू आवरता आले नाही. त्यांच्या दृष्टीने तो एक आदर्श प्रियकर होता. पती, भाऊ, बापही होता. काकाने आयुष्यभर हसत हसत रडविले आणि जाताना हा असा चटका लावून गेला. एका सुपरस्टारचे पर्व संपले होते. राजेश खन्ना यांच ग्लॅमर, स्टारडम अभिनय सर्वच अवर्ननीय होते. काळाच्या पलिकडे होते. असा सुपरस्टार होणे नाही. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**–email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)